(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

भारतीय संस्कृतीच्या वैज्ञानिक आणि सांस्कृतिक इतिहासाचा अभ्यास करताना जगातील या इतर संस्कृतींच्या इतिहासाचा अभ्यास म्हणूनच महत्त्वाचा ठरतो.

पाश्चात्य जगतामध्ये ५व्या शतकानंतर जरी अंधःकार युग चालू झाले असले तरी भारत, चीन या संस्कृत्या विकासाच्या टप्प्यावरच होत्या. ७व्या शतकामध्ये अरबस्तानामध्ये आणखीन एक नवीन संस्कृती म्हणजे 'इस्लाम'चा उदय झाला. इराण, इराक आणि इतर अरबी देशांमध्ये इस्लामनी पाय रोवल्यावर त्यांची इतर देशांवर आक्रमण चालू झाली. इराण आणि इराक या दोन्हीही देशांमध्ये इस्लामपूर्व संस्कृती अस्तित्वात होत्या. रोमन साम्राज्यामध्ये याचवेळी ख्रिस्तिधर्मानी आपले बस्तान तर बसवले होतेच पण आधीचे पॅगन, ज्यू, झोराष्ट्रीयन अशा अनेक ख्रिस्तपूर्व संस्कृतींवरती त्यांनी जुलूम, अत्याचार चालू केले. या पंथाचे अनेक लोक त्यामुळे इराण, इराकमध्ये स्थायिक व्हायला लागले. आपल्या स्वतःच्या संस्कृतीबरोबर रोमन आणि ग्रीक ग्रंथासकट ही मंडळी स्थलांतरीत होत होती. हा इतिहास एवढ्याकरताच महत्त्वाचा आहे की युरोपमध्ये जेव्हा अंधःकार युग चालू झाले होते, त्यावेळी इराक, इराणमध्ये वेगवेगळ्या संस्कृतींच्या विचारांचे आदानप्रदान होत होते.

इराणमधील गुंडीशापूर हे असेच एक ठिकाण. स्थलांतरीत झालेले ज्यू, झोरेस्ट्रीयन विद्वानांनी गुंडीशापूरमध्ये आश्रय घेतला. तेथेच त्यांचे इराणची भाषा पेहेलवीमध्ये, ग्रीक ग्रंथांच्या भाषांतराला सुरुवात झाली. साहजिकच वैद्यक, गणित, स्थापत्य या क्षेत्रामधील भारताचे आपले एक वैशिष्ट्यपूर्ण वैचारिक स्थान त्यांना आकर्षित करू लागले. अफगाणिस्तान मधून भौगोलिकदृष्ट्या शेजारीच असलेल्या या इराणमध्ये, म्हणजे गुंडीशापूरला, या भारतीय पंडितांना निमंत्रण येऊ लागली. ''पंचतंत्र'' हा आपला महत्त्वाचा ग्रंथ गुंडीशापूरमध्ये पहेलवी भाषेत ६व्या शतकातच भाषांतरीत झाला, आणि तेथून सिरीयन आणि जवळजवळ सगळ्याच युरोपियन भाषांमध्ये त्याचे भाषांतर झाले. ब्रह्मगुप्त हा त्यावेळच्या भारता मधील एक मोठा गणिती. त्याची ग्रहगणिताची कोष्टकं आणि आपले वैद्यक ग्रंथही गुंडीशापूरला पोहोचले आणि त्यांची भाषांतरं व्हायला लागली. थोडक्यात; गुंडीशापूरला ग्रीक आणि भारतीय ग्रंथांचे भाषांतर मोठ्या प्रमाणावर चालू झाले. काही शतकांमध्ये गुंडीशापूरचे हे ज्ञानकेंद्र, इराकमधील 'बगदाद'मध्ये स्थलांतरीत झाले.

८व्या ९व्या शतकामध्ये बगदादमध्येही भारताच्या गणिती आणि वैद्यकग्रंथांचे भाषांतर चालू झाले. पुढच्या तीन-चारशे वर्षामध्ये अनेक महत्त्वाच्या भारतीय गणिती ग्रंथांची तिथे भाषांतरे झाली. या भाषांतरीत ग्रंथांवर पुन्हा पुन्हा नव्याने टीका लिहिल्या गेल्या. यात सर्वात महत्त्वाचा भाषांतकार Mohammed ibn-Musa al-Khowarizmi हा ठरला. त्यांनी भारतीय अंगणित आणि बीजगणितावर आधारित ग्रंथ ९ व्या शतकात लिहिले. भारतीय ग्रहगणितातील कोष्टकेही त्यांनी भाषांतरीत केली. जगाच्या गणिताच्या इतिहासामध्ये हा एक फार मोठा टप्पा आहे. आज यावरती मोठ्या प्रमाणावर संशोधन ग्रंथ उपलब्ध आहेत. अरब जगताला १ ते ९ आकडे, आणि दशमान पद्धती al-Khowarizmi मुळे मिळाली.

त्यानी हे ग्रंथ ९व्या शतकाच्या पूर्वार्धात लिहिले असले तरी पण युरोपमध्ये त्यांचे संक्रमण

(पृष्ठ क्र. ३८ वर)

व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष अठरावे/अंक ४/एप्रिल २०१७

संपादक
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २१ वे/अंक १० वा

कार्यालय/पत्रव्यवहार
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

मुद्रणस्थळ :
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email:perfectprints@gmail.com

अनुक्रमणिका

१)	संपादकीय	डॉ. विजय बेडेकर	
२)	सिंगापूर येथील भारतीय राष्ट्रीय सेनेचे स्मारक	डॉ. सुधाकर आगरकर डॉ. नितीन जोशी	३
३)	विकासवेध-७: पीतक्रांती	श्री. नरेंद्र गोळे	५
४)	लेखन आणि भाषणतंत्र	श्री. अरविन्द दोडे	८
५)	भारतवर्षाची माता : पवित्र गंगा नदी	सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे	१०
६)	ओळख वनस्पतींची-दीपमाळा	श्री. प्रकाश दुधाळकर	२५
७)	मरावे परि दृष्टीदान करूनि नेत्ररूपी उरावे	सौ. स्मिता अमोल लिमये	२७
८)	सुभाषित	प्रा. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी	२९
९)	परिसर वार्ता	संकलित	३१

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

सिंगापूर येथील भारतीय राष्ट्रीय सेनेचे स्मारक

सिंगापूर शहरातील भारतीय राष्ट्रीय सेनेच्या स्मारकाला भेट देऊन हा लेख लिहिला आहे. या स्मारकाजवळ गेल्यावर दुसऱ्या महायुद्धाच्या आठवणी जाग्या होतात. – संपादक

जानेवारी महिन्यात डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन संस्थेतील विद्यार्थ्यांना सिंगापूरला नेण्यात आले होते. ही शैक्षणिक सहल असून त्यामध्ये शैक्षणिक संस्था आणि उद्योगांना भेट देण्याचा कार्यक्रम होता. सहलीच्या उत्तरार्धात विद्यार्थ्यांना काही तासांचा मोकळा वेळ देण्यात आला होता. या वेळेत सहलीचे बरेचसे सभासद मॉल मध्ये खरेदी करायला गेले. आम्हाला खरेदीत रस नसल्याने आम्ही सिंगापूर शहरातील एका महत्त्वाच्या ठिकाणाला भेट द्यायचे ठरवले. हे ठिकाण म्हणजे भारतीय राष्ट्रीय सेनेचे सिंगापूरमधील स्मारक होय.

स्मारकाशेजारी असलेला फलक

भारताला लवकरात लवकर स्वातंत्र्य मिळावे यासाठी धडपडणाऱ्या पुढाऱ्यांमध्ये सुभाषचंद्र बोस अग्रस्थानी होते. सविनय कायदेभंग, सत्याग्रह या मार्गाने लवकर स्वातंत्र्य मिळणार नाही असे त्यांचे मत होते. इंग्रजांनी बळाचा वापर करून हा देश बळकावला आहे आणि तो परत घेण्यासाठी आपल्याला बळाचाच वापर करावा लागेल यावर त्यांचा विश्वास होता. भारतातील बहुसंख्य जनता गांधींनी दाखविलेल्या शांततेच्या मार्गाने चालली होती. त्यामुळे त्यांच्या प्रयत्नांना फारसे यश मिळत नव्हते. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर मात्र हे चित्र बदलले. जर्मन सेना युरोपातील एकेक देश काबीज करीत होती. इकडे जपानी सेना आशिया खंडातील देशांवर विशेषतः इंग्रजांचे राज्य असणाऱ्या देशांवर आपले वर्चस्व स्थापन करण्याचा प्रयत्न करीत होती. या संधीचा फायदा करून घेण्याचे सुभाषचंद्र बोस यांनी ठरविले. संधी साधून ते भारतातून निसटले आणि जपानी सेनापतीशी संपर्क साधला. त्यांच्याकडून होकारार्थी प्रतिसाद मिळाल्यानंतर त्यांनी रास बिहारी बोस यांनी स्थापन केलेल्या भारतीय राष्ट्रीय सेनेचे पुनरुज्जीवन केले. सिंगापूर रेडियो स्टेशनवरून त्यांनी पूर्व आशियात राहणाऱ्या भारतीय लोकांना आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला. मोठ्या संख्येने लोक त्यांच्या सेनेत सामील झाले. या सेनेला 'आझाद हिंद सेना' या नावाने ओळखले जात असे.

सिंगापूरातील युद्धस्थळे दाखविणारा फलक

जपानी सेनेने सुभाषचंद्र बोस यांच्या मदतीने १९४२ साली सिंगापूरवर स्वारी केली. सिंगापूर त्यावेळी इंग्रजांच्या

ज्या व्यक्तीने कुठलीही चूक केली नाही त्या व्यक्तीने काहीही नवीन करण्याचा प्रयत्नच केला नाही.

ताब्यात होते. त्यांची सेना सज्ज होती. तरी जपानी सेनेने त्यांचा पाडाव केला. ह्या युद्धात भारतीय राष्ट्रीय सेनेचे काही जवान कामी आले. त्यांची आठवण कायम राहावी यासाठी एक स्मारक उभारण्यात आले. त्याचा कोनशिला समारंभ सुभाषचंद्र बोस यांच्या हस्ते करण्यात आला.

१९४२ ते १९४५ या कालावधीत सिंगापूर जपानी लोकांच्या ताब्यात होते. मात्र विजयाचा हा आनंद जपानी लोकांना जास्त काळ लुटता आला नाही. इंग्रज सेनेने १९४५ च्या जुलै महिन्यात पूर्ण तयारीनिशी पलटवार केला. त्यात त्यांची सरशी झाली. भारतीय राष्ट्रीय सेनेच्या सैनिकांसाठी उभारलेले स्मारक त्यांनी मोडून टाकले. एक स्मारक जमीनदोस्त झाले असे नसून भारतीय राष्ट्रीय सेनेचे स्वप्नच धुळीला मिळाले. युद्ध जसे पुढे गेले तसे आधीचे चित्र पार बदलून गेले. युरोपात जर्मन सेनेची पिछेहाट सुरू झाली. हिटलरने आत्महत्या केली. इकडे जपानवर अमेरिकेने दोन बाँब टाकले. त्यामुळे जपानला शरणागती पत्करावी लागली. युद्धाच्या धकाधकीत सुभाषचंद्र बोस एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करीतच होते. याच प्रवासात तायपेई जवळ झालेल्या विमान अपघातात त्यांचा अंत झाला. त्यामुळे सगळेच चित्र पालटले.

भारतीय राष्ट्रीय सेनेचे स्मारक

१९६५ साली सिंगापूरला स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर तेथील पुढारी देश बांधणीच्या कामाला लागले. देशाच्या विकासासाठी त्यांनी अनेक योजना आखल्या आणि त्यांची अंमलबजावणी केली. त्यातील एक महत्त्वाचे म्हणजे ऐतिहासिक स्थळांचे पुनरुज्जीवन होय. भारतीय राष्ट्रीय सेनेचे शहरात स्मारक असल्याची कल्पना शहराच्या योजनाकारांना होती. ते मूळच्या जागी उभारण्याची योजना त्यांनी आखली. त्याबरहूकूम त्यांनी नव्याने स्मारक उभारले. हे स्मारक म्हणजे भारतीय पर्यटकांच्या दृष्टीने एक तीर्थक्षेत्रच आहे. या ठिकाणाला भेट देण्याचे आम्ही ठरवले. शहराच्या ऐक्सप्लनेड पार्कमध्ये हे स्मारक आहे एवढी माहिती आम्हाला मिळाली. आमच्या राहण्याच्या ठिकाणापासून ते फार दूर नव्हते. आम्ही टॅक्सी मागविली आणि चालकाला त्या ठिकाणी घेऊन जाण्याची विनंती केली. त्याला ते स्मारक नेमके कोठे आहे हे माहीत नसावे. त्याने आम्हाला पार्कच्या दुसऱ्या टोकाला संसद भवनाजवळ सोडले. तेथून मार्ग काढत आम्ही इच्छित स्थळी पोहोचलो.

स्मारकाची निगा राखणाऱ्या संस्थेचे नाव

ऐक्सप्लनेड पार्कच्या एका बाजूला हे स्मारक आहे. जवळच सिटी हॉल आहे. थोडे पुढे ऐक्सप्लनेड मॉल आहे. स्मारकाच्या आजूबाजूचा परिसर फारच आल्हाददायक आहे. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली ही जागा मोकळी ठेवण्यात आली आहे. स्मारक माहितीपूर्ण असे केले आहे. त्यावर स्मारकाचा

(पृष्ठ क्र. ३० वर)

विकासवेध-७: पीतक्रांती

१९८६-८७ मध्ये ११० लक्ष टन असलेले तेलबियांचे उत्पादन, दुपटीने वाढून १९९४-९५ मध्ये २२० लक्ष टनापर्यंत पोहोचले होते. ही घटना ह्या पिकांच्या इतिहासात 'क्रांतीकारी' ठरली. म्हणून ही क्रांती, 'पीतक्रांती' नावास पात्र ठरली. 'पीतक्रांती' ची माहिती या लेखात दिली आहे. - संपादक

भारताच्या विकास कार्यक्रमातील तेलबियांची (गळिताच्या पिकांची) क्रांती १९९० च्या सुमारास घडून आली. 'भारतातील गळिताच्या पिकांची क्रांती' (१) ह्या देविंदर शर्मा ह्यांच्या, 'द हिंदुस्तान टाईम्स' मधील १ ऑक्टोबर २००१ च्या अंकातील लेखात, ह्याचा तपशील पाहता येतो. ते म्हणतात की, १९८६-८७ मध्ये ११० लक्ष टन असलेले तेलबियांचे उत्पादन, दुपटीने वाढून १९९४-९५ मध्ये २२० लक्ष टनापर्यंत पोहोचले होते. ही घटना ह्या पिकांच्या इतिहासात 'क्रांतीकारी' ठरली. तीळ (सीझम), मोहोरी (मस्टर्ड), सूर्यफुले (सनफ्लॉवर), भुईमूग (पीनट), शिरस (कॅनोला) इत्यादी तेलबियांची फुले पिवळी धमक असतात. दूरवर पसरलेल्या मोहोरीच्या शेतांचा रंग, बहारीच्या सुमारास पिवळाशार रंगून जात असतो. म्हणून ही क्रांती, 'पीतक्रांती' नावास पात्र ठरली. ह्या क्रांतीमुळे भारत तेलबियांच्या क्षेत्रात बहुतांशी स्वावलंबित्वापर्यंत पोहोचला.

चित्रातील वरच्या ओळीत अनुक्रमे तिळाचे रोप, तिळाचे बोंड आणि पांढरे व काळे तीळ दिसत आहेत. मधल्या ओळीत अनुक्रमे मोहोरी आणि मोहोरीची फुललेली शेते दिसत आहेत. सर्वात खालच्या, तिसऱ्या ओळीत, अनुक्रमे सूर्यफुलांचे शेत, सूर्यफूल आणि त्यातील तेलबिया दिसत आहेत.

भुईमुगाचे रोपटे, भुईमुगाचे फूल आणि भुईमुगाच्या शेंगा

मात्र जागतिक खुल्या व्यापाराच्या धोरणापायी, भारत सरकारने अवलंबलेल्या धोरणांच्या फलस्वरूप आपण पामोलीन, सूर्यफुलांचे तेल इत्यादी तेले, इतर उत्पादक देशांच्या दबावाखाली आयात करू लागलो. खाद्यतेलाच्या किंमती अदमासे १४% वाढल्या पण उत्पादन मात्र घटतच गेले. सरकारच्या विनाशकारी धोरणाचा लाभ तेल आयात करणाऱ्या खासगी उद्योगांनाच काय तो झाला. शेतकरी किंवा ग्राहकांना मुक्त आयातीचा लाभ मिळालाच नाही. पाच नकोशी तणे आणि अकरा विषाणू आजार सोबत येत असूनही सरकार सोयाबीनची आयात करतच राहिले. जनुक-परिवर्तित धान्यांचा पहिला हप्ताही त्यातच येऊन पोहोचला होता. आरोग्य आणि पर्यावरणास त्यांचा काय धोका संभवतो ह्याचा विचारच केला गेला नव्हता. नोव्हेंबर १९९८ ते जुलै १९९९ दरम्यान वनस्पती

तेलाची आयात तिप्पट झाली. २००० साली भारत सर्वाधिक तेल आयात करणारा देश ठरला (१). आयातीत मालाला त्यांच्या उगम-देशात भरघोस अनुदान लाभत असल्याने, स्वदेशी उत्पादने त्यांच्या व्यापारी रेट्यापुढे टिकाव धरीनाशी झाली. शिवाय, गळिताची धान्ये प्रामुख्याने कोरडवाहू जमिनीतच होत असल्याने, शुष्क प्रदेशातील लाखो शेतकरी, आयातीपायी हैराण झाले. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ लागल्या.

देशात २००५ साली होणारी खाद्यतेलांची सुमारे ३३% आयात, सरकारच्या चुकीच्या धोरणांपायी, २०१४ पर्यंत सुमारे ५९% पर्यंत जाऊन पोहोचली (३). देश सावकाशपणे, पण निश्चित स्वरूपाने परावलंबित्वाच्या गर्तेत चाललेला आहे. आता त्यामुळेच दुसऱ्या पीतक्रांतीचे वेध लागले आहेत. ती यशस्वी झाली तरच देश तेलबियांच्या क्षेत्रात स्वावलंबी बनू शकेल. कृषी-अर्थशास्त्र विभागाच्या एका अहवालात ह्याकरताचे उपाय चर्चिले गेले आहेत. नवे सरकार योग्य त्या उपायांचा अवलंब करेल अशी आपण आशा करू शकतो. भारताच्या भावी विकास कार्यक्रमातील विविध रंग-क्रांती खालील सूचीत प्रस्तुत करण्यात आलेल्या आहेत.

१. कृष्ण क्रांती - मातीचे तेल (पेट्रोलियम)
२. नील क्रांती - मत्स्योत्पादन
३. करडी क्रांती - चामडे / कोको

देशांतर्गत खाद्यतेलांच्या पुरवठ्याची परिस्थिती (लाख टनांत) (२)

तेलवर्ष नोव्हें-ऑक्टों	तेलबियांचे उत्पादन*	सर्व देशी स्रोतांपासूनच्या खाद्य तेलांची उपलब्धता	आयात (डी.जी.सी.आय.एस.)	खाद्य तेलांची एकूण उपलब्धता
२००५-२००६	२७९.७९	८३.१६	४०.९१	१२४.०७
२००६-२००७	२४२.८९	७३.७०	४६.०५	११९.७५
२००७-२००८	२९७.५५	८६.५४	५४.३४	१४०.८८
२००८-२००९	२७७.१९	८४.५६	७४.९८	१५९.५४
२००९-२०१०	२४८.८३	७९.४६	७४.६४	१५४.१०
२०१०-२०११	३२४.७९	९७.८२	७२.४२	१७०.२४
२०११-२०१२	२९७.९८	८९.५७	९९.४३	१८९.००
२०१२-२०१३	३०९.४३	९२.१९	१०६.०५	१९८.२४
२०१३-२०१४	३२८.७९	१००.८०	१०९.७६	२१०.५६
२०१४-२०१५	२६६.७५	८९.७८	१२७.३१	२१७.०९

* स्रोत: कृषीमंत्रालयातर्फे प्रसिद्ध केलेल्या चौथ्या आगामी अंदाजानुसार (१७-०८-२०१५)

४. सुवर्ण क्रांती – फळबागा / मध / ताग
५. हरित क्रांती – अन्नधान्य
६. राखाडी क्रांती – खते
७. गुलाबी क्रांती – कांदा / कोळंबी
८. रक्त क्रांती – मांस / भेद्र (टोमॅटो)
९. रजत क्रांती – अंडी / कुक्कुटपालन
१०. धवल क्रांती – दूध / दुग्धजन्य पदार्थ
११. पीत क्रांती – तेलबिया
१२. पंतप्रधान मोदींची तिरंगी क्रांती
    १. दुसरी हरित क्रांती – प्रथिनसमृद्ध डाळी
    २. दुसरी धवल क्रांती – पशुपालन
    ३. दुसरी नील क्रांती – मत्स्योत्पादन
    ४. केशर क्रांती – सौर ऊर्जा

तेलबिया आणि खाद्य तेले ह्यांचे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्व.

भारत हा जगातील सर्वात मोठा तेलबिया उत्पादक देश आहे. तेलबियांचे क्षेत्र देशाच्या कृषी–अर्थव्यवस्थेत महत्त्वाच्या स्थानावर आहे. धान्ये व कडधान्ये (सिरिल्स) वगळता तेलबिया हेच भारतातील प्रमुख पीक आहे. पिकाखालील क्षेत्र, उत्पादन आणि आर्थिक मूल्य ह्यांचेबाबत ही पिके; केवळ धान्यांच्याच पाठीमागे आहेत. भारत ही खाद्य तेलांची जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. पहिले आहेत अमेरिका, चीन, ब्राझिल आणि अर्जेंटिना. भारताची खाद्य तेलांची वार्षिक उलाढाल ८०,००० कोटी रुपयांची आहे. जगातील; १२ ते १५% तेलबियाक्षेत्रे भारतात आहेत, तेलबियांचे ७ ते ८% उत्पादन भारतात होते, ९ ते १२% खाद्यतेले भारतात आयात केली जातात, आणि ९ ते १०% खाद्यतेले भारतातच सेवन केली जातात (३).

भारतातील समृद्ध कृषी–परिसरशास्त्रीय वैविध्यामुळे, सर्व प्रकारच्या प्रमुख, वार्षिक, तेलबियांच्या पिकांकरता भारत आदर्शवत क्षेत्र आहे. देशात घेतल्या जाणाऱ्या नऊ तेलबियांच्या पिकांपैकी सात तेलबिया (सोयाबीन, भुईमूग (पीनट), पांढरी मोहोरी (रेपसीड), काळी मोहोरी (मस्टर्ड), सूर्यफूल, तीळ (सिझम), करडई (सॅफ्लॉवर) आणि कारळे (निगर) खाद्य तेलांच्या आहेत. उर्वरित दोन तेलबिया एरंडेल (कॅस्टर) आणि आळशी (लिन्सिड) अखाद्य तेलांच्या आहेत. बव्हंशी किरकोळ (एरंडेल, कारळे, करडई आणि तीळ इत्यादी) तेलबियांच्या उत्पादनात भारत जगात पहिला आहे. प्रमुख तेलबियांच्या बाबतची स्थिती पुढीलप्रमाणे आहे. भुईमूगाच्या उत्पादनात भारत जगात पहिला आहे, मोहोरीच्या उत्पादनात दुसरा आहे, आणि सोयाबीनच्या उत्पादनात पाचवा आहे.

गळिताची पिके ही, कोरडवाहू जमिनीत होणारी पिके असतात. केवळ पावसावर अवलंबून आहेत म्हणून त्यांच्या उत्पादनात दरसाल मोठी वाढ वा घट होत राहते. नियोजित, संग्रहित पाणवठ्यांच्या आधारे; आधुनिक उत्पादकता वाढविणा, तसेच साठवण्याच्या उपायांसहित ही पिके घेतल्यास; भारताची भूमी गळितांच्या पिकांना अनुकूल आहे. सरकारने आयातीचे धोरण बाह्य दडपणांखाली न ठरवता अंतर्गत आवश्यकतांबरहुकूम घडविले तर दुसरी पीतक्रांती नक्कीच घडून येऊ शकेल. मग मागणी आणि पुरवठ्याची परिस्थिती जोखून सरकारने आयात / निर्यातीचे धोरण राबवले तर उद्या भारत तेलबियांचा निर्यातदार देशही होऊ शकेल.

संदर्भः

१. द हिंदुस्तान टाईम्स मधील लेख
http://www.thehindubusinessline.com/2001/10/01/stories/04010304.htm

(पृष्ठ क्र. २६ वर)

लेखन आणि भाषणतंत्र

आंतरमहाविद्यालयीन डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती वादविवाद स्पर्धा नुकतीच संपन्न झाली. एक परीक्षक म्हणून आपले विचार मांडताना लेखनाचे तंत्र आणि भाषणाची सूत्रे थोडक्यात सांगितली. त्यांची ही मार्गदर्शनपर नोंद – संपादक

- लेखनाची सुरुवात करा, सुचेल तसे लिहित जा. लिहिता लिहिता लिहिता येते.
- रोज थोडेतरी लेखन करा. लिहिता लिहिता सुधारणा होत जातात. दर्जा सुधारत जातो. भाषा शुद्ध बनते.
- एकदा लिहिलेले पुन्हा लिहा. पुनर्लेखन म्हणजे आपणच स्वतः संपादक होऊन अधिक उत्तम लिहायचे. आळस नको.
- साधे, सोपे सुटसुटीत लिहा. दुर्बोधता टाळा. पाल्हाळ नको. मोजकेच शब्द वापरा. अर्थपूर्ण भाषा लिहा.
- जितके लिहाल त्यापेक्षा अधिक संवाद साधा. श्रोते समोर आहेत असे गप्पा करतात, तसे लिहा.
- चित्रदर्शी शैली आत्मसात करा. वर्णन करताना चित्र डोळ्यांपुढे उभे राहील असे बोला.
- अफाट वाचन करा. वाचनामुळे शब्दसंग्रह वाढतो. म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते, आख्यायिका, कविता भाषणात पेश करा.
- ऐकत राहा. उत्तम श्रोते व्हा. लक्षपूर्वक ऐका. प्राचीन काळात केवळ श्रवणभक्ती होती. ऐकण्याची कला आत्मसात करा.
- पाहा. निरीक्षण करा. श्रुती म्हणजे ऐकलेले आणि त्यानंतर स्मृती म्हणजे लक्षात ठेवलेले. यासाठी एकाग्रता वाढवा.
- अनुभवविश्व समृद्ध करा. अनुभवांत विविधता आणा. वैचित्रता आणा. रम्यता वाढवा.
- एकान्तात चिंतन करा. अनुभव अंगात/मनात भिनू द्या. अनेकांना भेटा. मनात साठवा. इतरांना ते सांगा.
- विचार करा. साधक-बाधक विचार करा. ही कला कष्टाने साध्य होते. मेंदू ताजा, टवटवीत ठेवा.
- लिहिण्यापूर्वी काही टिपणं तयार ठेवा. एका डायरीत नोंदी करा. आठवणींवर अवलंबून राहू नका.
- भाषेचा स्वभावधर्म ओळखा. मातृभाषेत लिहायचे/बोलायचे असेल तर उत्तम. इतर भाषांचे उच्चार शिकून घ्या.
- नवनिर्मितीचे तंत्र शिकून घ्या. लेखनात, भाषणात एक तर्कशास्त्र असू द्या. रसोन्नती होऊ द्या.
- अनुकरण करा. आवडत्या लेखक/वक्त्याचा अभ्यास करा. त्याची शैली समजून घ्या. हळूहळू स्वतंत्रपणे लिहा/बोला.
- इतर भाषांचा अभ्यास करा. त्यातील अभिजात साहित्य वाचा. आवडत्या भाषांत लिहा/बोला.
- साहित्यबाह्य विषयांत रस घ्या. गद्य, पद्य, समीक्षा, चित्रशिल्प, क्रीडा, नर्तन, गायन, वादन वगैरे विषयांची गोडी लावा.
- आपलेच अनुकरण करीत राहू नका. थोडे यश मिळाले की, लेखक/वक्ता तसेच करीत राहतो. नवीन काहीतरी द्या.

- एकापेक्षा अधिक साहित्यप्रकार वाचा/ लिहा. कथा, कविता, लेख लिहिल्यामुळे भाषणात अधिक रंजकता येते.
- आपणच आपले समीक्षक / परीक्षक व्हा. तटस्थपणे स्वतःच्या चुका ओळखा. इतरांचा सल्ला घ्या.
- आठवणींचे भांडार खुले करा. सुखदुःखांचा आनंद जुन्या आठवणींतून मिळवा. काळाचे महत्त्व समजावून घ्या.
- परकायाप्रवेश करायला शिका. प्रत्येक विषय आपल्या जिव्हाळ्याचा समजून व्यक्तिविषय खुलवा.
- अमानवी गोष्टींचे मानवीकरण करा. वृक्षवेली, पशुपक्षी, निसर्गाला आपल्याशी बोलू द्या.
- अद्‌भूतरम्यता वाढवा. कल्पनाविलास करा. श्रोत्यांना/ वाचकांना वास्तवतेपेक्षा अद्‌भूतविश्वात न्या. (हॅरी पॉटर)
- श्रोत्यांना आश्चर्यचकीत करा. आपल्या लेखनाचा/ भाषणाचा शेवट सुखद धक्कादायक केल्यास उत्तम.
- भाषणात सुसंगती येऊ द्या. झेन तत्त्वज्ञान वाचा. चिनी, जपानी रंग विसंगती पाहा.
- मानवी भावनांची मुळे/पाळे शोधा. वेदनांच्या मुळाशी जा. जीवनाची कारणे शोधा. मानसशास्त्र समजून घ्या.
- तटस्थपणे विचार मांडा. भाषणाच्या / लेखनाच्या विषयात गुंतू नका. भावविवश होऊ नका.
- तात्त्विक पातळी गाठा / उच्चविचारसरणी महत्त्वाची, शाश्वत सत्ये, चिरंतन तत्त्वे जाणून घ्या. ती सांगा.
- उजेडातून काळोखाकडे! हा उलटा प्रवास मोठा मजेदार असतो. काळोखात जा. स्वतःच्या ज्ञानाचा दिवा लावा.
- लिहिताना / भाषण करताना आनंदित व्हा. इतरांनाही आनंद मिळू द्या. वातावरण प्रसन्न ठेवा.
- जात, धर्म आणि राजकारण यावर कधीही बोलू नका.

(संदर्भ : अंतर्नाद/दिवाळी २०१६)

आपल्याला लेखाचे /भाषणाचे शारीरिक श्रम होतात. मानसिक कष्ट पडतात, पण त्या निर्मितीचा आनंद उपभोगता यायला हवा. इतरांनीही त्यात सहभाग घ्यायला हवा. शोकांतिकासुद्धा आनंद देते, ही विसंगती लक्षात ठेवा. जीवन फार धकाधकीचे झाल्याने ताणतणाव खूप वाढले आहेत. मनावर साठलेली धूळ पुसून आपले मन स्वच्छ, लख्ख आरशासारखे व्हावे म्हणून लेखन/ वाचन केले जाते. साहित्यिकाने / वक्त्याने या कर्तव्याचे भान ठेवल्यास लेखन / भाषण यशस्वी होऊ शकते.

या साऱ्या सूत्रांचा अभ्यास करा. प्रयोग करा. ती अंमलात आणा. चिंतन आणि मनन करा. दुःखाच्या समुद्रात सुखाचे बेट तयार करा. स्वतः सुखी व्हा. इतरांना सुखी करा. अधिक अभ्यासासाठी 'यु ट्यूब'वर ऐका, पुस्तके वाचा –

१. प्रा. शिवाजीराव भोसले – व्यक्तिचित्रे
२. प्रा. राम शेवाळकर – व्यक्तिचित्रे
३. व. पु. काळे – कथाकथनाची कथा
४. पु. ल. देशपांडे – कथाकथन
५. सदानंद जोशी – मी अत्रे बोलतोय
६. राम नगरकर – रामनगरी
७. द. मा. मिरासदार – कथाकथन
८. आचार्य अत्रे/भाषणसंग्रह/आत्मकथन.
९. सह्याद्रीचे वारे–यशवंतराव चव्हाण.

– अरविन्द दोडे
भ्रमणध्वनी : ९८१९१९५५९२
Email :arvinddode@gmail.com

●●●

विजेते वेगळ्या गोष्टी करत नाहीत. ते प्रत्येक गोष्ट वेगळेपणाने करतात.

भारतवर्षाची माता : पवित्र गंगा नदी

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत भारतीयांचे जीवन आपल्या जलाने सुखमय करणाऱ्या व हिंदूंचे श्रद्धास्थान असलेल्या गंगा नदीच्या माहात्म्याचा परामर्श घेणारा लेख. – संपादक

जगाच्या पाठीवर जेवढे देश आहेत त्यापैकी ज्या देशांमधून नद्या वाहतात त्या देशांमधील लोकांना त्यांच्या प्रदेशातून वाहणाऱ्या विविध नद्यांविषयी नितांत आत्मीयता असते. याचे कारण असे की, नद्या म्हणजे 'जीवन'. जेथून नद्या वाहतात त्यालगतच्या प्रदेशास सुजलाम् सुफलाम् करतात. त्यामुळे अनेकदा असे आढळते की, जेथून नद्या वाहतात तेथील लोक नद्यांना पूजताना देखील दिसतात. पृथ्वीवरील विविध देशांचे आपण अवलोकन केले तर असे लक्षात येते की, काही देशांमध्ये नद्याच नाहीत. नद्या नसणाऱ्या देशांपैकी अरबस्तानातील सौदी अरेबिया ह्या देशाचे एक उदाहरण होय. तसे पाहता अरबस्तान म्हणजे रेताड जमीन असलेला प्रदेश. येथील अनेक देशांमध्ये मुरमाड नापीक जमीन व वाळवंटच वाळवंट नजरेस पडते. असे असले तरी निदान ट्रायग्रिस, युफ्रेटस्, जॉर्डन इत्यादी नद्या अरबस्तानातील इतर देशांमधून वाहताना दिसतात. मात्र, सौदी अरेबिया हा देश याबाबतीत अतिशय दुर्दैवी आहे असे म्हणावे लागेल.

अजून एक गोष्ट आपल्या प्रकर्षाने लक्षात येते व ती म्हणजे अनेक देशांमध्ये काही नद्या वर्षभर पाण्याने भरून वाहत असतात,तर काही प्रदेशांमधील नद्या कडक उन्हाळ्यात वाळलेल्या दिसतात व त्यांचे पात्र उघडे पडलेले असते. तसेच एकाच प्रदेशातला काही भाग नद्यांना बारमाही पाणी असल्यामुळे वर्षभर हिरवागार असतो; तर काही प्रदेश दुष्काळग्रस्त/अवर्षणग्रस्त आढळतो. याबाबतीत भारतातील राजस्थान ह्या राज्याचे उदाहरण देता येईल. पश्चिम राजस्थानातील जैसलमेर, बिकानेर इत्यादी जिल्हे पूर्णतः वाळवंटमय असून उदयपूर सारख्या जिल्ह्यांमध्ये नदी व तळ्यांमुळे हिरवळ व चांगली शेती आढळते.

जगातील अनेक देश त्या तेथून वाहणाऱ्या नद्यांमुळे अस्तित्वात असून तेथील जनजीवन व संस्कृती त्या नद्यांमुळे टिकली व जोपासली गेली असे म्हणणे वावगे ठरू नये. याबाबतीत आपणास आफ्रिकेतील इजिप्त ह्या देशाचे उदाहरण देता येईल. इजिप्त ह्या देशातून वाहणाऱ्या केवळ 'नाईल' ह्या नदीमुळे तेथे प्राचीन काळात एक प्रगत सभ्यता अस्तित्वात आली, भरभराटीस पावली असे म्हणणे अतिशयोक्ती ठरू नये. त्यामुळेच इजिप्त ह्या देशाला 'नाईल नदीची देणगी' असे देखील म्हटले जाते.

नद्यांचे लोकजीवनांशी व कृषी वा शेतीशी असे नाते असल्यामुळे अनेक देशांमध्ये नद्या ह्या पवित्र तर मानल्या जातातच, मात्र भारतासारख्या देशात त्यांचे धार्मिक माहात्म्य देखील मोठ्या प्रमाणात असलेले आढळते. भारतीय उपखंडात विविध प्रांतांतून अनेक नद्या वाहताना आढळतात. भारतातील काही महत्त्वाच्या नद्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत – रावी, सतलज, चेनाब, चंबल, गंगा, गोमती, यमुना, नर्मदा, कोसी, गंडक, शोण, ब्रह्मपुत्रा, महानदी, गोदावरी, कृष्णा, भीमा, चंद्रभागा, कोयना, वारणा, पैनगंगा, वैनगंगा, मंदाकिनी, अलकनंदा, तुंगभद्रा, कावेरी इत्यादी. भारत गोड पाण्याच्या उपलब्धीबाबत व नद्यांच्याबाबतीत जगातील इतर अनेक देशांपेक्षा अतिशय सुदैवी देश आहे असे म्हणावे लागेल. भारतातील वर नमूद केलेल्या व इतरही अनेक नद्या बारमाही असून ह्या नद्यांनी त्यांच्या लगतचा भूप्रदेश सुजलाम् सुफलाम् करून टाकलेला आहे.

कष्टामुळे भविष्यकाळ चांगला होतो आणि आळसामुळे वर्तमानकाळ.

भारतात नद्यांच्या बाबतीत जनसामान्यांच्या मनात निस्सीम भक्ती व श्रद्धाभाव असल्याचे प्रकर्षाने लक्षात येते. उत्तरेपासून अती दक्षिणेकडे व पश्चिमेकडून अती पूर्वेकडील राज्यांमध्ये स्थानिक लोक आपापल्या प्रदेशातून वाहणाऱ्या नद्यांची मनोभावे पूजा करताना आढळतात. महाराष्ट्रापुरते म्हटले तर महाराष्ट्रात गोदावरी, चंद्रभागा इत्यादी नद्या अती पवित्र मानल्या जातात व ह्या नद्यांचा, प्रामुख्याने गोदावरीचा धर्मग्रंथांमध्ये व पुराणांमध्ये उल्लेख आलेला आहे. ह्या नद्यांच्या किनाऱ्यावर अनेक ठिकाणी हिंदूंची पवित्र तीर्थक्षेत्रे व तीर्थस्थळे असलेली निदर्शनास पडतात. यापैकी गोदावरी किनारी 'पंचवटी' तर चंद्रभागेतीरी 'पंढरपूरचा विठोबा' ही हिंदूंची पवित्र स्थळे असलेली दिसतात. पंचवटी हे महाराष्ट्रातील नाशिक ह्या जिल्ह्यात तर पंढरपूरचे विठ्ठल मंदिर सोलापूर जिल्ह्यात चंद्रभागेच्या तीरी आहे.

अशा तऱ्हेने भारतीयांच्या व प्रामुख्याने हिंदूंच्या मनात नद्यांविषयी अतिशय आदराची भावना असून त्यांचे धार्मिक महत्त्वदेखील खूप आहे. याबाबतीत उत्तर भारतातील गंगा या नदीविषयी तर संपूर्ण भारतवर्षात अतुलनीय अशी श्रद्धा असल्याचे आपल्या लक्षात येते. गंगा नदीला तर भारतात वाहणाऱ्या सर्व नद्यांमध्ये सर्वात जास्त 'पवित्र' असे मानले गेले आहे. गंगा नदीला स्वर्गीय नदीचा दर्जा असून तिला देवी म्हणून देखील पूजले जाते. सर्वसामान्य हिंदूंमध्ये गंगा नदीचे पाणी अती पवित्र असून ते प्राषन केल्यामुळे अनेक रोगराई बऱ्या होतात अशी भावना आहे. गंगा नदीच्या पाण्याच्या ह्या विशेष गुणधर्माविषयी शास्त्रज्ञ व पाण्याचा अभ्यास करणाऱ्या जलतज्ज्ञांनी देखील पाठबळ दिलेले आहे. हिंदू धर्मीयांमध्ये अशी निस्सीम श्रद्धा व गाढ विश्वास आहे की, मृत्युसमयी व्यक्तीच्या मुखात गंगाजल घातले तर त्या व्यक्तीस मोक्ष प्राप्त होतो. एवढेच नव्हे तर गंगा नदीत वा गंगाजलाने स्नान केल्याने व्यक्ती पापमुक्त होते असे मानणाऱ्या हिंदूंची संख्या देखील खूप आहे. त्यामुळेच भारतातील विविध भागांत राहणारे श्रद्धाळू हिंदू गंगानदीकाठी वसलेल्या वाराणसी (काशी), अलाहाबाद (प्रयाग), हरद्वार इत्यादी पवित्र तीर्थस्थळांची तीर्थयात्रा करून गंगा नदीच्या पवित्र जलात स्नान करण्यासाठी आलेले आढळतात.

गंगा नदीला हिंदू धर्मात जेवढे धार्मिक माहात्म्य देण्यात आले आहे तेवढे धार्मिक माहात्म्य व महत्त्व जगाच्या पाठीवरील कुठल्याही देशातील नदीला देण्यात आले नसावे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. याचे कारण म्हणजे, हिंदूंच्या मते गंगा नदी ही 'स्वर्गीय' नदी होय. ही नदीच मुळात स्वर्गातील असून ती ब्रह्मदेवाच्या कमंडलूत असे. ह्या नदीला स्वर्गातून पृथ्वीतलावर आणण्याची किमया भगीरथ ह्या राजाने केली असा उल्लेख हिंदूंच्या धर्मग्रंथात व पुराणांमध्ये येतो. भगीरथाने गंगा नदी आपल्या प्रखर व खडतर तपश्चर्येच्या बळावर पृथ्वीवर अवतरवली ह्या हिंदू धर्मातील पौराणिक घटनेस 'गंगावतरण' असे म्हटले जाते.

गंगा नदीला भारतातील लोक प्रामुख्याने हिंदू बांधव भक्तीभावाने 'गंगामाता' असे म्हणतात. उत्तर भारतातील उत्तर प्रदेश व बिहार या राज्यांतील लोक हिंदीमध्ये गंगेला 'गंगामैय्या' असे संबोधतात. यावरून स्पष्ट होते की, गंगा नदीला हिंदूधर्मीय बांधव आपल्या मातेसमान मानतात. हरद्वार व वाराणसी ह्या गंगा नदीच्या किनाऱ्यावर वसलेल्या हिंदू धर्मीयांच्या पवित्र तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी तर गंगा नदीची पूजा केली जाते व गंगेची आरतीदेखील केली जाते.

गंगा नदीमध्ये स्नान केल्यानंतर सर्व पापे धुऊन निघतात व मनुष्य प्राण्यास मोक्षप्राप्ती होते असे हिंदू मानतात. यामध्ये किती तथ्य आहे आपणास सांगता येणार नाही. शेवटी हा हिंदू बांधवांच्या धार्मिक श्रद्धेचा व विश्वासाचा भाग आहे. मात्र एवढे खरे आहे की, शास्त्रज्ञांच्या मते गंगा नदीच्या पाण्यात विशिष्ट प्रकारचे

घटक आढळतात व ह्या घटकांमुळे इतरत्र सापडणाऱ्या पाण्यापेक्षा गंगा नदीमधील पाण्यातील घातक जीवजंतूंची संख्या निश्चितच कमी आहे. तसेच गंगाजलात स्नान केल्यानंतर शरीरावरील काही जीवजंतूदेखील मारले जातात असे काही अभ्यासकांचे मत आहे. गंगा नदी उत्तर व पूर्व भारतातील करोडो लोकांचे आपल्या जलामुळे पालन-पोषण करते. गंगा नदीच्या आसपासचा प्रदेश अतिशय सुपीक आहे. अर्थात ह्याला गंगेतून वाहून येणारा गाळ कारणीभूत आहे. त्यामुळेच, उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल इत्यादी राज्यांतील बराचसा भूप्रदेश वर्षभर गर्द हिरव्या पिकांनी नटलेला असतो. ह्या राज्यांतील कानपूर, अलाहाबाद, वाराणसी, पाटणा, मुर्शीदाबाद, इत्यादी महत्त्वाची शहरे गंगेच्या किनाऱ्यावर वसलेली आहेत. ह्या शेकडो गावांतील लोक शेतीसाठी व पिण्यासाठी गंगाजलाचा वापर तर करतातच त्यासोबतच अनेक लोक आपल्या गुराढोरांना आंघोळ घालून स्वच्छ करण्यासाठी व स्वतःदेखील आंघोळ करण्यासाठी गंगेच्या पात्राचा वापर करतात. सद्यस्थितीत गंगानदीला सर्वात मोठा धोका आहे तो तिच्या पात्रात अशा मानवी कृत्यांमुळे होणारे प्रदूषण. मात्र आश्चर्याची बाब अशी की, गंगेचे होणाऱ्या प्रदूषणामुळे गंगेच्या पाण्यातील काही विशिष्ट जीवजंतू मारण्याच्या प्रतीत वा गुणवत्तेत काही जास्त परिणाम झालेला आढळत नाही असे अभ्यासक म्हणतात. असे असले तरी, गंगेचे प्रदूषण ही भारतासमोरील फार महत्त्वाची व गंभीर बाब आहे. आपण भारतीयांनी पुढाकार घेऊन ह्या नदीच्या होणाऱ्या प्रदूषणात घट करण्यासाठी महत्त्वाची पावले उचलणे ही काळाची गरज आहे. गंगेचे ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्व पाहिले तर ह्या नदीच्या किनाऱ्यावरच पाटलीपुत्र, कनोज, मुर्शीदाबाद, काम्पिल्य, कोलकता इत्यादी ऐतिहासीक राजधान्यांची शहरर प्राचीन व मध्ययुगीन काळात वसलेली आढळतात. ह्यापैकी पाटलीपुत्र हे शहर म्हणजे इसवी सन पूर्व ५ व्या व ६ व्या शतकात मगध ह्या जनपदावर राज्य करणाऱ्या हरयंक ह्या राजघराण्यातील राजांच्या राजधानीचे शहर होते. ह्या राजघराण्यातील अजातशत्रू ह्या राजाने इसवी सनपूर्व ४९० मध्ये गंगा नदीच्या किनाऱ्यावर 'पाटलीग्राम' नामक किल्ला बांधला व ह्याच किल्ल्याचे रुपांतर कालांतराने पाटलीपुत्र नामक शहरात झाले असे अभ्यासकांचे मत आहे. हे पाटलीपुत्र शहर सध्याच्या बिहार ह्या राजधानीचे शहर असलेल्या पाटण्याच्या अगदी शेजारी होते असे इतिहासकार मानतात. त्यामुळेच सध्याचे पाटणाच प्राचीन काळचे पाटलीपुत्र होय असे अनेकजण मानतात. पाटलीपुत्र ह्या शहराचा उल्लेख अनेक प्राचीन ग्रंथांमध्ये, प्रामुख्याने बौद्ध ग्रंथांमध्ये येतो. तसेच मौर्यांच्या काळातील प्रसिद्ध ग्रीक राजदूत मेगस्थनीस ह्यानेदेखील पाटलीपुत्र शहराचा उल्लेख आपल्या सुप्रसिद्ध 'इंडिका' ह्या ग्रंथात केलेला आढळतो. कनोज हे शहर देखील उत्तर प्रदेशमध्येच असून भारतीय इतिहासाच्या प्राचीन काळाचा शेवट होण्याच्या पूर्वी इसवी सन ८ व्या, ९ व्या व १०व्या शतकामध्ये गुर्जर-प्रतिहार, पाल व राष्ट्रकुट ह्या तीन राजघराण्यांमध्ये कनोज शहर काबीज करण्यासाठी अनेकदा संघर्ष झालेला आढळतो. यापैकी गुर्जर-प्रतिहार हे उत्तरेकडील, पाल हे बंगालकडील तर राष्ट्रकुट हे राजघराणे दक्षिण भारतातील होते. मुर्शीदाबाद ह्या शहराला १८ व्या शतकाच्या सुरुवातीपासून महत्त्व यायला सुरुवात झाली. बंगाल हा मुघलांच्या साम्राज्यातील महत्त्वाचा सुभा वा प्रांत होता. त्याकाळात ढाका ही बंगाल प्रांताची राजधानी होती. १७०४ मध्ये औरंगजेबाच्या मुर्शीद कुली खान ह्या बंगालच्या दिवाणाने ढाक्याहून मुर्शीदाबादला राजधानी हलवली. काम्पिल्य ह्या शहराचा उल्लेख तर महाभारत काळापासून येतो. काम्पिल्य ही महाभारतातील पांचाल ह्या राज्याच्या धृपद राजाची राजधानी होती. त्याचप्रमाणे पुराणांमध्ये उल्लेख झालेल्या इक्ष्वांकू राजघराण्यातील प्रसिद्ध राजा हरीसेन ह्याचे काम्पिल्य हे जन्मस्थळ होते असे अभ्यासक म्हणतात. भगवान श्रीराम हे ह्याच राजकुळातील सर्वात प्रसिद्ध राजे होते असे उल्लेख हिंदू धर्मग्रंथांमध्ये येतात. कोलकता शहरास

ब्रिटिशकाळात कलकत्ता असे म्हणत. हे कलकत्ता शहर ब्रिटिशकाळात भारताच्या राजधानीचे ठिकाण होते. २० व्या शतकात ब्रिटिशांनी कलकत्त्याहून दिल्ली येथे भारताची राजधानी हलविल्याचे निदर्शनास येते.

वर उल्लेख केलेल्या शहरांप्रमाणे इतर अनेक ऐतिहासिक शहरे गंगा नदीच्या किनाऱ्यावर वसलेली आहेत. अशा स्थानांची गिनती करणे फार कठीण होईल. एवढे मात्र खरे की, गंगा नदीने प्राचीन काळापासून ते आजपर्यंत अनेक शहरांची जडण-घडण पाहिलेली आहे नव्हे त्यात तिचा अप्रत्यक्ष सहभाग आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. अगदी कौरव-पांडवांचे राजधानीचे शहर हस्तीनापूर देखील गंगा नदीच्या किनाऱ्यावर होते असे उल्लेख येतात. गंगापुत्र भीष्म जेव्हा केव्हा कुटुंबातील अंतर्गत कलहांमुळे भावनाविवश होत तेव्हा ते आपली माता गंगेच्या किनाऱ्यावर जात व अश्रू ढाळीत असे दाखले महाभारतात आढळतात. अशावेळी गंगामाता आपल्या बलवान, सत्यवचनी व ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा घेतलेल्या व सामर्थ्यशाली योद्धा असलेल्या भीष्म नामक पुत्राचे सांत्वन करीत असे.

गंगेच्या पृथ्वीवरील अवतरणाच्या वैष्णव व शैव पंथीयांकडून वेगवेगळ्या कथा सांगितल्या जातात. गंगा नदीचा उल्लेख ऋग्वेदात आलेला आहे. ऋग्वेद काळात इंद्र हा अतिशय महत्त्वाचा देव मानला जाई. इंद्राला देवेंद्र म्हणजेच देवांचा राजा असेदेखील संबोधले जाई. म्हणजेच वेदिक काळात व प्रामुख्याने ऋग्वेदीक काळात इंद्राला फार महत्त्व होते. इंद्राला स्वर्गाचा राजा असे देखील मानले गेले आहे. हिंदूधर्मातील एका कथेनुसार 'वृत्र' ह्या महासर्पाने स्वर्गीय नद्यांचे पाणी जखडून टाकले होते. यावेळी इंद्राने वृत्राचा वध करून ह्या स्वर्गीय पाण्याला म्हणजेच नद्यांना मोकळे केले. अर्थात, ह्या नद्यांमध्ये गंगा नदीचा समावेश होता. काही ठिकाणी वृत्र हा आसुर असल्याचा देखील उल्लेख सापडतो. इंद्राला ह्या कामात भगवान विष्णूने मदत केली होती. त्यामुळे गंगेचा व इतर नद्यांचा विष्णुसोबत संबंध जोडला गेला.

वैष्णव परंपरेत असे मानतात की, गंगा नदी विष्णुच्या पायाच्या अंगठ्यातून स्वर्गामधून अवतरीत झाली. विष्णूने अगदी सूक्ष्मातून अतीविशाल रूप धारण केले व पृथ्वी, आकाश तसेच स्वर्ग व्यापून टाकला. त्याने आपले एक पाऊल पृथ्वीवर, दुसरे आकाशात तर तिसरे स्वर्गात टाकले. स्वर्गात पाऊल टाकल्यानंतर भगवान विष्णूने आपल्या पायाच्या अंगठ्याने स्वर्गाला अत्युच्च ठिकाणापर्यंत नेऊन वा ताणून तेथून आपल्या अंगठ्याद्वारे नद्यांना व प्रामुख्याने गंगेला मुक्त केले. अशाप्रकारे भगवान विष्णूने तिचा मार्ग मोकळा केल्यानंतर गंगा अगोदर इंद्राच्या स्वर्गात अवतरली. येथे ध्रुव ताऱ्याने गंगा नदीचे झेलून स्वागत केले. तेथून पुढे गंगा नदी अवकाशातून चंद्रावर अवतरली व तेथून मेरू पर्वताच्या लागलीच वर असलेल्या ब्रह्मदेवाच्या ब्रह्मलोकात अवतरली. ह्या ब्रह्मलोकातून गंगेचे चार प्रवाह झाले व ते चार वेगवेगळ्या दिशांना वाहू लागले. ह्यापैकी एक अलकनंदा हा प्रवाह वा शाखा भारतातून गंगा या नावाने वाहू लागली. वैष्णव गंगेच्या अवतरणाची ही कथा सांगताना व यात विश्वास ठेवताना आढळतात. गंगानदी विष्णुच्या पायातून प्रकट झाली अशी वैष्णवांची धारणा असल्यामुळे विष्णुभक्त गंगा नदीस 'विष्णुपदी' असे संबोधताना देखील आढळतात.

शैव पंथीयांमध्ये प्रसिद्ध असलेली गंगावतरणाची कथा पुढीलप्रमाणे आहे - कोणे एकेकाळी भारताच्या पूर्व भागात सागर नामक राजा होऊन गेला. हा राजा अतिशय बलाढ्य व सामर्थ्यवान होता. ह्या सागर राजाने 'अश्वमेध' यज्ञ करण्याचे ठरविले कारण आपली कीर्ती जगभरात व्हावी व इतर सर्व राजांनी त्याचे सामर्थ्य व ताकद मान्य करावी अशी त्याची अभिलाषा होती. प्राचीन काळात अशाप्रकारे आपले सामर्थ्य सिद्ध करण्याचा राजमार्ग म्हणजे अश्वमेध यज्ञ करणे हा होता. ह्या

यज्ञानंतर राजा एक घोडा विविध राज्यांतून फिरण्यासाठी सोडत असत. ह्या घोड्यासोबत वा अश्वासोबत अश्वमेध केलेल्या राजाच्या राज्याचा ध्वज व त्याचे शिपाई असत. हा अश्व अशातऱ्हेने एक वर्ष विविध राज्यांतून फिरविला जाई. जर हा अश्व एखाद्या राजाने आपल्या राज्यात अडविला तर याचा अर्थ त्याला अश्वमेध यज्ञ करणाऱ्या राजाचे वर्चस्व मान्य नाही असे समजले जात असे व मग अश्व अडविलेल्या राजास अश्वमेध करणाऱ्या राजासोबत युद्ध करणे क्रमप्राप्त होते. मात्र, अश्वमेधाचा अश्व जर कोणीच अडविला नाही तर अश्वमेधकर्त्या राजाचे वर्चस्व इतरांना मान्य आहे असे समजले जाई व तो राजा 'चक्रवर्ती' समजला जाई. असा अश्वमेध यज्ञ भगवान श्रीरामाने देखील केला होता व त्याचा अश्व त्याचे पुत्र लव व कुश यांनी अडवला होता. ही कथा आपणास रामायणात वाचावयास मिळते. असो. सागर राजाला दोन बायका होत्या. त्यापैकी एकीला साठ हजार पुत्र होते तर दुसरीला फक्त एक पुत्र होता. सागर राजाचे हे साठ हजार पुत्रच आपल्या पित्याच्या अश्वमेध अश्वाचे रक्षण करण्याकरिता अश्वासोबत गेले. सागर राजाचा अश्व हिंडत फिरत ऋषीवर्य कपीलमुनी हे जेथे ध्यानास बसले होते तेथे आला. तेव्हा तेथे असे चित्र होते की, कपीलमुनी शांतचित्ताने तपश्चर्या करत आहेत व सागर राजाचा अश्व त्यांच्याशेजारी चरत आहे. इकडे सागर पुत्रांना आपला अश्वमेधाचा घोडा गेला कोठे? हा प्रश्न पडला. ते साठ हजार सागरपुत्र आपल्या पित्याच्या अश्वास जंगल खोऱ्यात सर्वत्र शोधू लागले. शेवटी त्यांना आपला अश्व कपीलमुनींच्या जवळ चरत असलेला आढळला. हे दृश्य पाहून सागरपुत्रांचा समज झाला की, कपीलमुनींनी आपला अश्व येथे अडवून ठेवला आहे व त्यांनी आपला पिता सागर ह्यास आवाहन दिले आहे. त्यामुळे साठ हजार सागरपुत्र कपील मुनींची निर्भत्सना करू लागले. मात्र, त्यांचा हा गैरसमज होता. खरी गोष्ट वा तथ्य असे होते की, कपीलमुनी आपल्या ध्यानात मग्न होते व सागर राजाचा अश्व त्यांच्या शेजारी केव्हा आला याची त्यांना काहीच कल्पना नव्हती. शेवटी, सागरपुत्रांनी घातलेल्या गोंधळामुळे कपीलमुनींच्या तपश्चर्येत विघ्न पडले व त्यांचे ध्यान तुटले. त्यामुळे कपीलमुनी कोप पावले व त्यांनी आपल्या शापाने त्या साठ हजार सागरपुत्रांना भस्म करून टाकले. इकडे मात्र अनेक महिने सागर राजा आपल्या अश्वमेधाच्या अश्वाची व आपल्या साठ हजार पुत्रांची वाट पाहू लागला. शेवटी सागर राजाचा दुसऱ्या बायकोपासूनचा पुत्र अंशुमन हा साठ हजार सागर पुत्रांना शोधण्यासाठी बाहेर पडला व तो शोधता-शोधता सागर किनाऱ्यावरील कपीलमुनींच्या आश्रमाजवळ पोहोचला. त्याने पाहिले की, कपीलमुनी ध्यानमग्न आहेत, त्यांच्या आसपास अश्वमेधाचा अश्व चरत आहे व जवळच राखेचा ढीग आहे. अंशुमन तेथे शांत चित्ताने उभा राहिला. कपीलमुनी जोपर्यंत स्वतःहून डोळे उघडत नाहीत तोपर्यंत अंशुमनाने तेथेच उभे राहण्याचे ठरविले. मात्र, काहीतरी अनुचित घडले असावे अशी पाल त्याच्या मनात चुकचुकली. शेवटी कपीलमुनींनी आपले डोळे उघडले तेव्हा त्यांना आपल्यासमोर राजपुत्र अंशुमन दिसला. कपीलमुनींनी त्याच्याकडून अश्वमेध यज्ञाविषयी व त्याच्या साठ हजार भावांविषयीची माहिती जाणून घेतल्यावर ते त्याला म्हणाले की, 'तू संवेदनशील व्यक्ती वाटत आहेस, परंतु तुझ्या साठ हजार भावांनी उद्दामपणा केला व माझ्या तपश्चर्येत अडथळा आणून माझे ध्यान भंग केले. त्यामुळे मी त्यांना शाप दिला व त्यांना भस्म केले व समोर दिसणारा राखेचा ढिगारा म्हणजे त्यांच्या अस्थी होत', असे अंशुमनला सांगितले. कपील मुनींनी अंशुमनला असेही सांगितले की, याबाबतीत ते आता काहीही करू शकत नाहीत. मात्र अंशुमनाला आपले दुःख अनावर झाले होते. त्यामुळे आपल्या भावंडांना निदान मृत्यूनंतर स्वर्गलोक तरी प्राप्त होईल याबाबतचा उपाय सुचविण्याची त्याने कपील

ऋषींना विनंती केली. त्यावर कपीलमुनी म्हणाले की, स्वर्गातून वाहणाऱ्या गंगा नदीच्या पवित्र जलाने साठ हजार सागर पुत्रांच्या अस्थी धुऊन निघाल्या तरच त्यांना स्वर्गप्राप्ती होऊ शकते.

राजपुत्र अंशुमन, कपीलमुनींनी दिलेला वृत्तांत घेऊन स्वगृही परतला व त्याने सागर राजास ही सर्व माहिती दिली. अर्थात, सागर राजा दुःखाने व्याकूळ झाला. त्याचप्रमाणे आपले साठ हजार पुत्र कपील मुनींसोबत वाईट वागले याचीही त्याला खंत वाटली. त्यानंतर सागर राजाने वनात जाऊन तप केले. मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. अशाप्रकारे सागर राजाच्या कुळातील अनेक पिढ्यांतील राजांनी साठ हजार सागर पुत्रांना स्वर्गप्राप्ती व्हावी यासाठी तप केले. मात्र, ह्यातील कुणाच्याही तपामध्ये गंगा नदीला प्रसन्न करून तिला पृथ्वीवर आणण्याचे सामर्थ्य नव्हते.

अनेक पिढ्यांनंतर सागर राजाच्या कुळात भगीरथ ह्या राजपुत्राचा जन्म झाला. भगीरथाला अर्थातच, त्याच्या कुळातील ही दुःखद घटना कळली व ह्याच भगीरथाने आपल्या पूर्वजनांना स्वर्गप्राप्ती करून देण्यासाठी गंगेला पृथ्वीवर अवतरण्यास भाग पाडण्याचे ठरविले. भगीरथाने आपले राज्य कुशल लोकांच्या हवाली केले व तो स्वतः हिमालयात गेला. हिमालयात जेथे सध्या गंगा नदीचा उगम आहे तेथे म्हणजेच 'गंगोत्री' ह्या ठिकाणी भगीरथाने एका पायावर उभे राहून गंगेच्या पृथ्वीवर अवतरणासाठी खडतर तपश्चर्या केली असा उल्लेख पुराणांमध्ये येतो. भगीरथाच्या ह्या खडतर तपश्चर्येमुळे प्रसन्न होऊन गंगेने पृथ्वीवर येण्याचे मान्य केले. मात्र, गंगामाता भगीरथाला म्हणाली की, 'मी पृथ्वीवर येण्यास तयार आहे; परंतु माझ्या धारा स्वर्गातून पृथ्वीवर कोसळतील वा पडतील तेव्हा त्याच्या वेगामुळे व वेगवान प्रवाहामुळे पृथ्वी दुभंगण्याची शक्यता आहे.' यावर भगीरथाने गंगेस मार्ग सुचविण्याचे सांगितले. तेव्हा गंगामाता म्हणाली की, 'माझ्या ह्या वेगावान प्रवाहाला झेलण्याचे व त्याला शांत करण्याचे सामर्थ्य केवळ महादेवामध्ये (शिवा, शंकर) आहे.' त्यामुळे भगीरथाने अनेक वर्षे महादेवाची तपश्चर्या केली. भगीरथाच्या ह्या तपश्चर्येवर महादेव देखील प्रसन्न झाले व त्यांनी भगीरथाची मदत करण्याचे मान्य केले. अशातऱ्हेने भगीरथाने खडतर तपश्चर्येच्या जोरावर स्वर्गीय गंगा नदीस पृथ्वीवर येण्यास भाग पाडले. भगवान शंकर हिमालयात गंगा नदीच्या धारा आपल्या जटांमध्ये झेलण्यासाठी उभे राहीले व गंगेचा स्वर्गीय वेगवान प्रवाह त्यांच्या जटांमध्ये कोसळला. भगवान शंकराने गंगेच्या अवखळ प्रवाहाला आपल्या जटांत शांत केले व 'गंगोत्री' जेथून गंगा नदी उगम पावते तेथे तिच्या शांत धारा पाडल्या. भगीरथाने आपल्या अथक प्रयत्नांमुळे गंगा नदीस पृथ्वीवर आणल्यामुळे तिच्या सुरुवातीच्या प्रवाहास 'भगीरथी' असे संबोधले जाते. पुढे देवप्रयाग ह्या ठिकाणी गंगोत्रीहून निघालेली भगीरथी व बदरीनाथच्या हिमशिखरांतून उगम पावलेली अलकनंदा यांचा संगम होतो व तेथून पुढे ह्या प्रवाहास खऱ्या अर्थाने 'गंगा नदी' असे संबोधले जाते. तत्पूर्वी रुद्रप्रयाग येथे केदारनाथच्या हिमशिखरांतून उगम पावणारी मंदाकिनी व बदरीनाथ येथून उगम पावणारी अलकनंदा ह्या नद्यांचा संगम होतो. असो. अशाप्रकारे गंगेस पृथ्वीवर अवतरण्यास भाग पाडून भगीरथ तिच्या पवित्र प्रवाहास कपील मुनींच्या आश्रमापर्यंत घेऊन गेला व त्या गंगाजलाने त्याच्या साठ हजार पूर्वजांच्या अस्थी धुऊन निघाल्या व त्यांना स्वर्गप्राप्ती झाली. अर्थात हे ठिकाण सागराजवळ वा समुद्राजवळ म्हणजेच सध्याच्या पश्चिम बंगालमध्ये असल्याचे भाविकांचे म्हणणे आहे. येथेच सागर ह्या बेटाजवळ गंगा नदी बंगालच्या उपसागरास जाऊन मिळते. त्यामुळे गंगेचे उगमस्थान 'गंगोत्री'ला जसे महत्त्व आहे तसेच महत्त्व सागर बेटाला आहे. दरवर्षी अनेक भाविक ह्या सागर बेटावर मनोभावे येत असतात. आपण येथे जी 'गंगावतरणाची' कथा सांगितली ती कथाच

सर्वसामान्य हिंदू भाविकांमध्ये व शैवपंथीयांमध्ये सर्वश्रृत व प्रसिद्ध आहे.

वर उल्लेखिलेल्या 'गंगावतरणाच्या' हिंदू धर्म ग्रंथांत दिलेल्या कथेचा अभ्यास अनेक अभ्यासकांनी केलेला आढळतो. काही ठिकाणी वर दिलेल्या कथेत थोडेफार बदल आढळतात. हे बदल असे की, सागर हा सामर्थ्यवान राजा होता. परंतु त्याला पुत्रप्राप्ती होत नव्हती. महणून तो आपल्या केशिणी व सुमती ह्या दोन राण्यांसह हिमालयात गेला व त्याने कैलास पर्वतावर पुत्रप्राप्तीसाठी तपश्चर्या केली. त्याच्या तपश्चर्येमुळे सप्तर्षींपैकी एक महान ऋषी भृगु हे प्रसन्न झाले व त्यांनी सागर राजाला वर दिला की, तुला एका राणीपासून एकच पुत्र होईल व दुसऱ्या राणीपासून साठ हजार पुत्र होतील.

भृगु ऋषींपासून वर प्राप्त झाल्यानंतर सागर राजा स्वगृही परतला. भृगुंच्या वराप्रमाणे सागरास केशिणीपासून एक पुत्र प्राप्त झाला तर सुमतीपासून साठ हजार पुत्रांची प्राप्ती झाली. अशा तऱ्हेने आपली पुत्रप्राप्तीची इच्छा पूर्ण झाल्यावर सागर राजा आनंदी झाला व त्याने मनापासून चांगला राज्यकारभार केला व आपल्या राजधर्माचे मनोभावे पालन केले. काही कालावधीनंतर सागर राजाने अश्वमेध यज्ञ करून 'चक्रवर्ती' राजाचा किताब प्राप्त करण्याचे ठरविले व त्याप्रकारे अश्वमेध यज्ञ करून आपला अश्व सोडला. सागर राजाची एक चांगला व धर्म व न्यायाने राज्य करणारा राजा म्हणून ख्याती व कीर्ती फार दूरवर पसरलेली होती. त्यामुळे त्याच्या अश्वमेध अश्वास कोणीही रोखले नाही व सागरापर्यंत (समुद्रापर्यंत) त्याचे राज्य पसरले. तेव्हा देवांना भीती वाटली की, सागर राजाच्या साम्राज्याची व्याप्ती स्वर्गापर्यंत होईल. हा विचार मनात आल्यामुळेच देवांनीच सागर राजाचा अश्व जाणून-बुजून कपील ऋषी जेथे तप करत होते तेथे नेऊन बांधला. ही देवांविषयीची घटना इतर कथांमध्ये आलेली आढळत नाही. आपला अश्वमेध अश्व परत आला नाही याचा अर्थ त्याला कोणीतरी रोखला असावा, आपणास आव्हान दिले असावे असे वाटून सागराने आपल्या पुत्रांना अश्वमेधाचा अश्व शोधून आणण्यास सांगितले. तेव्हा ते साठ हजार पुत्र आपल्या पित्याचा अश्व शोधण्यासाठी बाहेर पडले. त्यांनी आकाश-पाताळ एक केले. सागरपुत्र अनेक जंगल, पर्वत व खोऱ्यांमध्ये भटकले. ते अगदी पाताळात देखील गेले. तेथे त्यांना अती विशाल असा दैवी गज विरुपाक्ष देखील दिसला. शेवटी, त्यांना आपला अश्व कपीलमुनींच्या आश्रमाजवळ असल्याचे आढळले व त्यांनी मुनींची निर्भत्सना केली त्यामुळे कपिल ऋषींनी त्यांना भस्म केले. ह्या कथेत अजून एक बदल आढळतो व तो म्हणजे सागर पुत्र अश्वाचे रक्षण करण्यासाठी सुरुवातीपासून गेले नव्हते तर अश्व परत आला नाही म्हणून त्यास शोधण्यासाठी पित्याच्या आज्ञेनुसार गेले होते. ह्या कथेतील अजून एक बदल वा फरक म्हणजे अंशुमन हा सागर राजाचा पुत्र नसून तो राजाचा नातू होता.

महादेव जेव्हा भगीरथावर प्रसन्न होऊन गंगा नदीला आपल्या जटांमध्ये झेलण्यासाठी उभे राहिले तेव्हा, दुसऱ्या एका कथेनुसार आपणास पृथ्वीवर येण्याची आज्ञा करणारा हा देव कोण असावा? मी त्यास आपल्या प्रवाहाने वाहून नेईन असा विचार गंगेने केला. भगवान शंकराला गंगेच्या मनातील हा विचार कळला व त्याने गंगेचे गर्वहरण करण्याचे ठरविले. त्यामुळे जेव्हा गंगा नदी शंकराच्या जटांमध्ये कोसळली तेव्हा त्याने गंगा नदीला आपल्या जटांमध्ये खूप वेळ जखडून टाकले व गंगानदी एखाद्या जंगलात भटकावी तशी महादेवाच्या जटांमध्ये बराच काळ भटकत राहिली. शेवटी, भगीरथाला दिलेल्या वरदानाची आठवण ठेवून महादेवाने गंगेच्या प्रवाहाला आपल्या जटांमधून मुक्त केले व 'गंगोत्री' येथे सोडले.

गंगामाता प्राणीमात्र, मनुष्य तसेच देवांनादेखील

मदत करणारी व त्यांच्याकडून काही विपरित घडले असेल तर त्यांना पापमुक्त तसेच शापमुक्त करून त्यांना शुद्ध करणारी जगद्माता आहे अशी हिंदूंची निस्सीम श्रद्धा आहे. ह्या श्रद्धेची पुष्टी करणाऱ्या अनेक कथा आपणास हिंदू धर्मग्रंथामध्ये सापडतात. अशीच एक कथा हिंदूंमध्ये आजही खूप लोकप्रिय असलेल्या 'महाभारत' ह्या महाकाव्यात आहे. ही कथा महाभारतातील अतिशय महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व भीष्म पितामह यांच्याशी निगडित आहे. सदर कथा खालीलप्रमाणे आहे.

पुराणांमध्ये उल्लेख आलेल्या 'इक्ष्वांकू' ह्या राजघराण्यात महाभीष ह्या राजाचा जन्म झाला होता. इक्ष्वांकू राजघराण्यातील पहिल्या राजाचे नाव इक्ष्वांकू हेच होते. ह्याच प्रसिद्ध अशा इक्ष्वांकू राजघराण्यात मर्यादा पुरुषोत्तम रामाचा जन्म झाला होता. प्रभू राम हा विष्णूचा अवतार होता असे हिंदू मानतात. रामाने दैत्यराज रावण ह्याचा पराभव केला होता. प्रभूरामाची संपूर्ण गाथा 'रामायण' ह्या महाकाव्यात वर्णिली गेली आहे. रामायणाचे कर्ते वाल्मिकी ऋषी होते असे म्हटले जाते. असो. तर इक्ष्वांकू हे एक राजघराणे होते ह्या राजघराण्याला 'सूर्यवंशी' घराणे वा कूळ म्हणून देखील संबोधले जाई. महाभीष ह्या राजाने हजार अश्वमेध यज्ञ केले व शंभर वेळा घोड्यांच्या शर्यतीचे सण साजरे केले. त्यामुळे देव त्याच्यावर प्रसन्न वा खुश झाले व महाभीषाला स्वर्गात स्थान मिळाले. एकदा, स्वर्गात ब्रह्मदेव आले तेव्हा सर्व उपस्थित देवांनी व ऋषींनी त्यांना अभिवादन केले. यात महाभीषाचा देखील समावेश होता. साक्षात विधी (ब्रह्मदेव) प्रगट झाले आहेत म्हणून गंगामाता देखील स्वर्गात आली. त्यावेळी गंगामातेचे वस्त्र थोडे वर उडाले व तिच्या पायाचा काही भाग उघडा पडला ते पाहून सर्व देवांनी आपल्या माना खाली घातल्या. मात्र महाभीष ते दृश्य ताठ मानेने पाहत राहिला. हा सर्व प्रकार पाहून ब्रह्मदेवाला राग आला व त्यांनी महाभीषाच्या ह्या कृत्याबद्दल तो पुन्हा एकदा मर्त्य मनुष्याच्या जन्माला येईल असा शाप दिला. त्यानंतर महाभीषाने उपस्थित देवगण व ऋषींसोबत सल्लामसलत करून पृथ्वीतलावरील कुरुवंशातील प्रतीप ह्या राजाच्या पोटी जन्म घेण्याचे ठरविले.

अशा तऱ्हेने ब्रह्मदेवाच्या शापामुळे महाभीषाचा जन्म प्रतीपाचा पुत्र शंतनू म्हणून झाला. पित्यानंतर शंतनू हस्तिनापूरचा राजा झाला. तो एक चांगला व प्रजादक्ष राजा म्हणून प्रसिद्ध पावला. एकदा तो गंगेच्या तीरावरील अरण्यात भटकत असताना त्याच्या नजरेत एक स्वर्गीय सुंदर स्त्री पडली. ही स्त्री स्वतः गंगानदी होती. ती एका सुंदर स्त्रीच्या रूपात शंतनूसमोर प्रगट झाली होती. शंतनू गंगा नदीच्या त्या स्वर्गीय सौंदर्यामुळे अगदी प्रेम घायाळ झाला होता व त्याच्या मनात गंगेसारखी सुंदर स्त्री ही आपली पत्नी असावी ही इच्छा निर्माण झाली. शंतनूने ही आपली इच्छा गंगेजवळ व्यक्त केली. गंगामातेने शंतनू सोबत विवाह करण्याची संमती दिली, मात्र त्यासाठी काही अटी घातल्या. ह्या अटी अशा होत्या की, गंगामातेला शंतनूने तिच्या एखाद्या कृत्यापासून तिला परावृत्त करण्याचा प्रयत्न करू नये. एवढेच नव्हे, तर तिला तिच्या कुठल्याही कृत्याविषयी जाब विचारू नये व तिच्याप्रति जहाल शब्दांचा वापर करू नये. शंतनूने जर ह्याबाबत गंगेला विचारणा केली वा एखादे कृत्य करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला तर त्याच क्षणी ती शंतनूचा पती म्हणून त्याग करील.

अशाप्रकारे गंगामातेने शंतनूला आपल्या अटी पाळण्यासाठी वचनबद्ध करून घेतले व त्याच्यासोबत विवाह केला. विवाहानंतर शंतनू व गंगा अतिशय आनंदात व सुखात आपले दिवस व्यतीत करू लागले. गंगामातेला शंतनूपासून आठ पुत्रदेखील झाले. मात्र, गंगामाता पुत्र जन्माला आल्यानंतर त्या पुत्राला लगेचच गंगेच्या पात्रात

नेऊन सोडून (बुडवून) देत असे. अशाप्रकारे तिने आपल्या पहिल्या सात पुत्रांना गंगेच्या प्रवाहास अर्पण केले. शंतनू राजा हे सर्वकाही पाहात असे व त्याने गंगेच्या कृत्यांबाबत तिला विचारणा करणार नाही वा रोखणार नाही अशा स्वरूपाचे वचन दिलेले असल्यामुळे तो गंगेला तिच्या ह्या कृत्याबाबत जाब विचारत नसे. मात्र, गंगेला जेव्हा आठव्या पुत्राची प्राप्ती झाली व ती जेव्हा त्या पुत्रालादेखील गंगेच्या प्रवाहात सोडण्यास गंगेच्या तीरावर गेली तेव्हा शंतनूला राहवले नाही व त्याने गंगेला तू हे कृत्य का करत आहेस? अशी विचारणा केली. अगोदरच तिने सात पुत्रांना गंगा प्रवाहात सोडलेले होते व आता हा आठवा पुत्रदेखील ती गंगेत का सोडत आहे? शंतनूने गंगेला असा प्रश्न केला.

शंतनूने हा जाब विचारल्यावर गंगामातेने शंतनूला ह्या मागचे कारण सांगितले. ते कारण असे होते की, एकदा आठ वसू (अष्टवसू) मेरू पर्वतावरील वशिष्ठ ऋषींच्या आश्रमात आपापल्या पत्नींसह गेले होते. बृहदराण्यक उपनिषदामध्ये दिलेली आठ वसूंची नावे व महाभारतात दिलेली वसूंची आठ नावे यांच्यात तफावत असल्याचे वा काही नावे वेगळी असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. तर आपला मुद्दा असा होता की, हे आठ वसू वशिष्ठ ऋषींच्या आश्रमात गेले. तेथील निसर्ग-सौंदर्य पाहून त्यांना व त्यांच्या पत्नींना खूप आनंद झाला. त्यावेळी द्यौ (द्यु) ह्या वसूच्या पत्नीने वशिष्ठ ऋषींची हिरवळीत चरत असलेली 'कामधेनू' ही गाय पाहिली. ही सर्व इच्छापूर्ती करणारी 'कामधेनू' गाय द्यौच्या पत्नीला पाहता क्षणीच आवडली. आपल्या दुधाद्वारे मानवमात्रांना तृप्त करणारी ही गाय प्रजापती दक्षाची कन्या सुरभी व तिचे पती कश्यप ऋषी (सप्तर्षींपैकी एक) यांची कन्या होती. तर द्यौ ह्या वसूच्या पत्नीला 'कामधेनू' आवडली व तिने आपल्या पतीला ती गाय आपणास आणून देण्यास सांगितले. द्यौच्या पत्नीला ही कामधेनू गाय उशीनार ऋषींची कन्या व तिची मैत्रीण जीतावती हिला द्यावयाची होती. त्यामुळे पृथु, द्यौ आदी आठ वसूंनी वशिष्ठ ऋषींची कामधेनू गाय त्यांना न सांगता ओढून नेण्याचे दुष्कृत्य केले. वशिष्ठ ऋषी जेव्हा अरण्यातून परत आले तेव्हा त्यांना त्यांची प्रिय 'कामधेनू' गाय नजरेस पडली नाही. तेव्हा त्यांनी आपल्या दिव्यदृष्टीने झालेला प्रकार पाहिला व आठ वसूंना शाप दिला की त्यांच्या ह्या कर्मामुळे ते काही काळ आपले देवत्व गमावतील व मनुष्य कुळात जन्माला येतील.

वशिष्ठ ऋषींचा हा शाप ऐकून वसूंना वाईट वाटले व त्यांनी वशिष्ठ मुनींना उःशाप देण्याची विनंती केली. वसूंची विनवणी ऐकून वशिष्ठ ऋषींना त्यांची दया आली व त्यांनी वसूंना उःशाप दिला की, आठपैकी सात वसूंना मनुष्य रुपात जन्म झाल्या झाल्याच तात्काळ मुक्ती मिळेल. याचे कारण त्यांच्या मनात पाप आले होते मात्र, त्यांचा पाप कृत्यात प्रत्यक्ष सहभाग नव्हता. मात्र, द्यौ ह्या आठव्या वसूनें म्हणजे ज्याने 'कामधेनू' गाय ओढून नेण्याचे दुष्कृत्य केले त्याला मात्र मनुष्य रुपातील सर्व जीवन जगावे लागेल व आपल्या कर्माची फळे भोगावी लागतील. हा आठवा वसू अतिशय शूर योद्धा म्हणून प्रसिद्ध पावेल व आयुष्यभर ब्रह्मचारी राहील. हा वसू म्हणजेच महाभारतातील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व भीष्म 'पितामह' हे होत. गंगामाता शंतनूला ही सर्व कथा सांगते व म्हणते की, 'वसू हे देव असल्यामुळे भूतलावरील कुठल्याही मर्त्य स्त्रीच्या उदरात जन्म घेऊ शकत नव्हते.' त्यामुळेच वसूंच्याच विनंतीवरून गंगेने तिच्या उदरात त्यांचा पिंड वाढवून त्यांना जन्म देण्याचे मान्य केले होते. गंगामातेने हे सर्व वसू वशिष्ठ ऋषींच्या शापातून मुक्त होऊन पुन्हा स्वर्गात व वसूलोकात जावेत ह्यासाठी केले होते. गंगा हे सर्वकाही शंतनूला सांगून झाल्यानंतर म्हणाली की, 'तू मला दिलेले मला माझ्या कृत्यांबद्दल जाब न विचारण्याचे वचन तोडल्यामुळे मी तुला कायमची सोडून जात आहे. त्याचप्रमाणे तिने शंतनूला सांगितले की, ती हे बाळ (आठवा वसू)

सोबत घेऊन जाईल व त्याचे संगोपन करून त्याला सर्व विद्यांमध्ये व प्रामुख्याने शस्त्रविद्यांमध्ये (कारण तो क्षत्रिय कुळात जन्माला आला होता) प्रवीण झाल्यानंतर योग्यवेळी पुन्हा शंतनूच्या हवाली करीन. कारण एक पिता म्हणून शंतनूचा त्याच्यावर पूर्ण हक्क होता. पुढे अनेक वर्षांनी शंतनू एकदा गंगेच्या किनारी गेला असता त्याला असे दृष्य दिसले की, एक अतिशय धिप्पाड, उमदा, बलवान व देखणा तरुण आपले बाण गंगेच्या पात्रात मारून गंगेचा पूर्ण प्रवाह थांबवत आहे. त्यामुळे जेथे बाण मारलेत तेथून पुढचे वा खालच्या बाजूचे गंगेचे पात्र उघडे पडले आहे. शंतनू हे दृश्य पाहून त्या तरुणाकडे जातो त्याचवेळी गंगामाता तेथे प्रगट होते व शंतनूला म्हणते की, हा बलवान व देखणा तरुण म्हणजे शंतनूचा आठवा पुत्र होय. असे म्हणून गंगामाता तिचा व शंतनूचा आठवा पुत्र देवव्रत वा गांगेय ह्यास शंतनूच्या सुपूर्त करते व अंतर्धान पावते. देवव्रतास शस्त्रास्त्र विद्येत साक्षात परशुरामाने निपूण केलेले असते. देवव्रत पुढे भीष्म ह्या नावाने प्रसिद्ध पावला व तो आयुष्यभर ब्रह्मचारी राहिला. महाभारतातील ह्या प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वाविषयी अनेक हिंदूंना माहिती आहेच. ही कथा येथे सांगण्याचा उद्देश असा आहे की, हिंदूंची अशी धारणा आहे की, गंगामाता फक्त मनुष्य प्राण्यास मोक्षप्रातीसाठी मदत करत नाही तर ती देव-देवतांनासुद्धा संकटातून व त्यांनी केलेल्या पापातून मुक्त करते.

गंगा नदीचे सर्वसामान्य हिंदू व्यक्तींच्या मनात धार्मिक दृष्ट्या फार महत्त्वाचे स्थान आहे. अगोदर नमूद केल्याप्रमाणे गंगाजलात स्नान केल्यामुळे सर्व पापे धुऊन निघतात व गंगाजल प्राशन केल्यामुळे शरीर शुद्ध होते असेही हिंदू बांधव मानतात. त्यामुळे गंगोत्री ते सागर बेट ह्या गंगेच्या उगमापासून ते ती जेथे बंगालच्या उपसागराला जाऊन मिळते तेथपर्यंत गंगेच्या किनाऱ्यावर अनेक ठिकाणी भक्तगण मोठ्या श्रद्धेने स्नान करताना आढळतात. गंगेच्या ह्या विस्तीर्ण व प्रदीर्घ प्रवाहात ठिकठिकाणी प्रसिद्ध तीर्थे असून तेथे जाऊन स्नान करणे म्हणजे अजून जास्त पुण्यप्राप्ती करणे होय असे हिंदू मानतात. ह्या तीर्थांपैकी काही प्रसिद्ध तीर्थे म्हणजे गंगेचे उगमस्थान गंगोत्री, देवप्रयाग, ऋषीकेश, हरद्वार, प्रयाग, वाराणसी (काशी) इत्यादी होत.

'गंगोत्री' हे गंगेचे उगमस्थान भारतातील उत्तराखंड ह्या राज्यातील गढवाल ह्या भागात आहे. ह्या ठिकाणी गंगेचे एक मंदिर असून भाविक गंगा नदीत स्नान करून बाजूलाच असलेल्या गंगा नदीच्या मंदिरात मूर्तीरुपी गंगानदीचे दर्शन घेतात. ह्या मंदिरात गंगामातेसोबतच भगवान शिव व राजा भगीरथ, यमुना नदी, सरस्वती नदी तसेच दुर्गामाता व अन्नपूर्णा माता यांच्या मूर्ती आहेत. भगवान शिव व गंगेचे नाते हे पती पत्नीचे नाते आहे असे मानले जाते. ह्या मंदिरात भक्तगण दिवसभर पूजा करण्यात वा दर्शन घेण्यात मग्न असतात व सायंकाळी गंगेची आरती केली जाते. हिवाळ्यामध्ये हे मंदिर साधारणतः ऑक्टोबर वा नोव्हेंबरमध्ये बंद ठेवले जाते. याचे कारण हिवाळ्यात हिमालयात व प्रामुख्याने गंगोत्रीसारख्या समुद्र सपाटीपासून अती उंचावर असलेल्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात बर्फवृष्टी होते. ह्या हिमवर्षावामुळे भक्तगणांना गंगोत्रीला जाणे कठीण होऊन बसते. त्यामुळेच हे मंदिर हिवाळ्यात बंद ठेवले जाते. एप्रिल वा मे महिन्यात अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर गंगामातेचे हे मंदिर भाविकांसाठी पुन्हा एकदा खुले केले जाते.

'गंगोत्री' हे गंगामातेचे उगमस्थान मानले जात असले तरी गंगेचे खरे मूळ वा उगमस्थान गंगोत्रीच्याही वर जवळ जवळ पंधरा किलोमीटरच्या अंतरावर आहे. गंगोत्री हे तीर्थस्थळ पुरोहितांच्या दृष्टीने उमगस्थान मानले जाते. गंगोत्रीच्यावर जेथे गंगानदी खऱ्या अर्थाने उगम पावते त्या ठिकाणास 'गोमुख' असे म्हणतात. याचे कारण तेथील बर्फाळ प्रदेश गोमुखासारखा म्हणजेच

गाईच्या मुखासारखा भासतो. ह्यावरून अजून एक गोष्ट सिद्ध होते की, हिंदू धर्मात गायीला फार महत्त्वाचे व पवित्र स्थान आहे. फार पूर्वीपासून गायीची पूजा हिंदू धर्मात प्रचलीत असल्याचे दाखले सापडतात. प्राचीन काळात जेव्हा वैदिक संस्कृतीची सुरुवात झाली तेव्हा लोक कृषी व पशुधनावर आपल्या उपजीविकेसाठी अवलंबून असत. त्यांना हवे असणारे अन्न शेती करून पिकविले जाई व गायीपासून दूध मिळे. गायीचे दूध रुचकर व औषधी तर असेच पण त्यापासून दही, लोणी, तूप इत्यादी दुग्धजन्य पदार्थ देखील मिळत; ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात शरीरास लागणारी जीवनसत्त्वे व इतर गोष्टी असत. येथे अजून एक महत्त्वाची बाब म्हणजे प्राचीन वैदिक संस्कृतीपासून ते आजपर्यंत बहुसंख्य हिंदू शाकाहार घेणे पसंत करतात. त्यामुळे त्यांच्या आहारात दूध व दुग्धजन्य पदार्थ जास्त प्रमाणात आढळतात. आपण याबाबतीत तमीळ ब्राह्मणांचे निरिक्षण केले तर लक्षात येते की, ते आपल्या जेवणात जास्त प्रमाणात दही भात घेणे पसंत करतात. असो. तर हिंदू धर्मीय गायीस अतिशय पवित्र मानतात. त्यामुळे आपण हिंदूंच्या विविध तीर्थक्षेत्रांना गेलो व तेथे जर जंगलातून झरा वगैरे निघाला असेल तर त्या झऱ्याच्या उगमस्थानाला गायीसारखे मुख असलेले शिल्प बसविले जाते व त्या गोमुखातून ते पाणी वळविले जाऊन तेथून ते पाणी पिण्यासाठी वापरले जाते. हे दृश्य आपणास अनेक तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी आढळते वा दिसते. प्राचीन काळी आपण पाहिले तर अनेक राजे ऋषींना गायींचे दान देताना आढळतात. त्याचप्रमाणे ज्याच्याकडे सर्वात जास्त गायी तो जास्त श्रीमंत मानला जाई.

गंगेचा प्रवाह व खऱ्या अर्थाने भगिरथीचा प्रवाह गंगोत्रीपासून निघून देवप्रयाग येथे अलकनंदेशी (यात मंदाकिनी नदीच्या पाण्याचाही समावेश आहे. कारण यापूर्वी रुद्रप्रयाग येथे अलकनंदा व मंदाकिनी एकमेकींस मिळतात) मिळतो व येथून पुढील प्रवाहास गंगा संबोधले जाते. देव प्रयाग वरून गंगा ऋषीकेश येथे पोहोचते व ऋषीकेशवरून हरद्वारला येते. हरद्वार वा हरिद्वार हे हिंदूधर्मीयांचे एक अतिशय पवित्र तीर्थक्षेत्र आहे. येथे गंगेत स्नान केल्यावर सर्व पापे धुऊन जातात असे भक्तगण मानतात. एवढेच नव्हे तर, हरद्वारपासून शंभर मैलाच्या अंतरावरून देखील गंगामातेस पुकारल्यास पापमुक्ती मिळते व विष्णुलोक प्राप्त होतो असे भाविक मानतात. हरद्वार म्हणजे स्वर्गाचे द्वार होय असेही हिंदूधर्मीय मानतात. हरद्वार येथे गंगेचा हिमालयातील प्रवास संपतो व ती येथे मैदानी प्रदेशांमध्ये प्रवेश करते.

गंगेच्या किनाऱ्यावरील अजून एक महत्त्वाचे तीर्थ म्हणजे 'प्रयाग' हे होय. हे तीर्थ सध्याच्या उत्तर प्रदेश ह्या राज्यात अलाहाबाद ह्या जिल्ह्यात आहे. अलाहाबाद हे नाव मध्ययुगीन काळातील मुघल सम्राट अकबर याने ठेवलेले असून हिंदूधर्म ग्रंथांमध्ये ह्या स्थळाचा उल्लेख 'प्रयाग' असाच येतो. प्रयागला हिंदूधर्मीय 'तीर्थराज' असेही म्हणतात. हिंदू पौराणिक कथांनुसार सृष्टीकर्ता ब्रह्मदेवाने येथे फार पूर्वी एक यज्ञ केला होता. त्यामुळेच ह्या ठिकाणास 'प्रयाग' असे नाव पडले. 'प्रयाग' ह्या पवित्र तीर्थक्षेत्राचे माहात्म्य आपणास मत्स्य पुराणातून कळते. प्रयाग या तीर्थाची व तेथील गंगाजलाची महती सांगणारा एक प्रसंग महाभारतात आहे. कौरव व पांडवांच्यामधील युद्ध समाप्ती नंतर युद्धिष्ठिराला फार दुःख होते. आपल्या बांधवांचा, आप्तेष्टांचा, गुरुजनांचा आपल्या हातून संहार झाला आता आपण हे पाप कोठे फेडावे असे म्हणून तो रडू लागला तेव्हा मार्कंडेय ऋषींनी युद्धिष्ठिराचे सांत्वन केले व त्यांनी युद्धिष्ठिराला सल्ला दिला की, त्याने प्रयाग येथे जाऊन गंगेच्या पवित्र जलात स्नान करावे म्हणजे त्याची सर्व पापे धुऊन निघतील. या प्रसंगावरून प्रयाग ह्या क्षेत्राचे महात्म्य किती जुने आहे ते आपल्या लक्षात येते. आजही लाखो भाविक 'प्रयाग'ला गंगा स्नानासाठी भारताच्या विविध भागांतून येताना

आढळतात. प्रयागचे अजून एक महत्त्व म्हणजे येथे गंगा, यमुना व सरस्वती ह्या हिंदूंच्या अती पवित्र तीन नद्यांचा संगम आहे. यातील सरस्वती नदी गुप्त असल्याचे भाविक मानतात.

गंगेच्या तीरावरील अजून एक महत्त्वाचे पवित्र तीर्थक्षेत्र म्हणजे वाराणसी (काशी) हे होय. वाराणसी हे शहर जगातील सर्वात जुन्या तीन शहरांपैकी एक मानले जाते हे भगवान शिवाने निर्माण केलेले व त्याचा येथे कायम निवास असलेले ठिकाण मानले जाते. त्यामुळे ह्या ठिकाणाविषयी हिंदूंच्या मनात निस्सीम श्रद्धा आहे. काशीला देखील भारताच्या विविध प्रांतांतून हिंदू भाविक येत असतात. भाविकांची ही रीघ वर्षभर चालू असते. काशीविषयी म्हटले जाते की, तेथे उत्तर प्रदेशातील हिंदी भाविकांची संख्या कमी व भारतातील इतर प्रांतांतून येणाऱ्या विविध प्रादेशिक भाषा बोलणाऱ्या हिंदूंची संख्या जास्त असते. यावरून भारताच्या कानाकोपऱ्यात ह्या तीर्थाविषयी असलेली आस्था लक्षात येते. वाराणसी येथील सर्वात प्रसिद्ध असे महादेवाचे काशी विश्वनाथाचे मंदिर आहे. येथे गंगा नदीच्या किनाऱ्यावर अनेक घाट आहेत व भाविक ह्या विविध घाटांवर भक्तीभावाने गंगाजलात स्नान करत असतात. येथील गंगेवरचा सर्वात प्रसिद्ध असा घाट म्हणजे 'मणीकर्णिका' हा घाट होय. ह्या घाटावर महाराष्ट्रातील श्रेष्ठ संतशिरोमणी एकनाथ महाराज येऊन गेल्याचे दाखले सापडतात. काशी येथे गंगास्नान केल्यास सर्व पापांतून मुक्ती मिळून मोक्ष प्राप्त होतो असे हिंदू बांधव मानतात. येथे मृत्यू आल्यास देखील मोक्ष प्राप्त होतो असे अनेकजण मानतात. काशी येथून देखील भाविक आपापल्या घरी गंगाजल घेऊन जातात व त्याचा वापर मंगल प्रसंगी, पूजेच्या वेळी व देवाचा अभिषेक करताना करतात. असे म्हटले जाते की, काशीची यात्रा करून तेथील पवित्र गंगाजल घेऊन दक्षिण भारतातील म्हणजेच तमीळनाडू ह्या राज्यातील रामेश्वरम् येथे जाऊन तेथील शिवलिंगाचा काशीतील गंगाजलाने अभिषेक केल्यास मोठे पुण्य प्राप्त होते व काशीची तीर्थयात्रा देखील खऱ्या अर्थाने पूर्ण होते.

अशी ही संपूर्ण भारत वर्षात हिंदू धर्मीयांच्या मनात वेगळे स्थान असणारी व इतर धर्मीयांचे देखील पालन पोषण करणारी गंगामाता प्रदीर्घ प्रवास करून पश्चिम बंगालमध्ये सागर या बेटाजवळ बंगालच्या उपसागरास जाऊन मिळते. ह्या सागर बेटाचे देखील हिंदू धर्मीयांमध्ये मोठे माहात्म्य आहे. याचे कारण गंगेची सर्व कथाच येथून सुरू होते. कपीलमुनी ह्याच भागात तपश्चर्या करत होते असे भक्तलोक मानतात. त्यामुळेच येथे कपील मुनींचे मंदिर देखील बांधण्यात आले आहे. गंगा नदी जेथे सागरास मिळते त्या ठिकाणास 'गंगासागर' असे म्हटले जाते. अनेक हिंदू भाविक दरवर्षी येथे देखील स्नान करण्यास जातात व येथील स्नान देखील शुभ व पवित्र मानले जाते. प्रामुख्याने मकर संक्रांतीच्या मुहूर्तावर येथे स्नान करणे शुभ मानले जाते. तसेच ज्येष्ठ महिन्यात सुद्धा येथे स्नान करण्यासाठी मोठी गर्दी होत असते.

गंगेचे अजून एक महत्त्व म्हणजे हिंदूधर्मानुसार चार कुंभमेळे भरत असतात. ह्या कुंभमेळ्यांना खूप महत्त्वाचे स्थान आहे. ह्या चार कुंभमेळ्यांपैकी एक कुंभमेळा महाराष्ट्रातील गोदावरी या नदीच्या काठी नाशिक (त्र्यंबकेश्वर) येथे भरतो; तर दुसरा कुंभमेळा उज्जैन (मध्ये प्रदेश) येथील शिप्रा नदीच्या किनाऱ्यावर भरतो. उरलेले दोन कुंभमेळे गंगा नदीच्या किनाऱ्यावर हरद्वार व प्रयाग ह्या तीर्थक्षेत्रांवर भरतात. यातूनदेखील गंगानदीचे धार्मिक माहात्म्य अधोरेखीत होते.

आपण पाहिले की, गंगा नदी उत्तराखंडा पासून पश्चिम बंगालपर्यंत शेकडो मैलांचा प्रवास करून पश्चिम बंगालमध्ये बंगालच्या उपसागरात सागर ह्या बेटाजवळ विलीन होते. गंगा नदीची उत्तराखंड व उत्तर प्रदेश ह्या राज्यामध्ये अतिशय मनोभावे पूजा केली जाते.

उत्तराखंडातील हरीद्वार व उत्तरप्रदेशातील वाराणसी (काशी) येथे तर गंगामातेची आरती होते व तिला दीप व फुलांचे हारसुद्धा अर्पण केले जातात. उत्तर भारताप्रमाणेच बंगालमध्ये देखील गंगा नदीची पूजा पूर्वापारपासून करण्याचा प्रघात आहे. बंगालमध्ये गंगामातेवर अनेक कविता व गाणी रचलेली आढळतात. गंगेवर कविता व गाणी लिहिणाऱ्यांपैकी रामप्रसाद हे एक प्रसिद्ध कवी आहेत. रामप्रसाद एके ठिकाणी म्हणतात की, 'जेव्हा त्यांचा अंत (जीवनाचा शेवट) येईल तेव्हा ते गंगेमध्ये विलीन होत असावेत व त्यांच्या मुखातून कालीमातेचे नाव निघावे.'

बंगालमध्ये विविध व्रते व पूजा-अर्चा करताना गंगाजलाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. येथील धार्मिक दृष्ट्या श्रद्धाळू कुटुंबांमध्ये सकाळी व सायंकाळी पूजा करताना भगवद्गीतेसारख्या पवित्र ग्रंथातील काही श्लोक वाचत असताना देवाला गंगाजल अर्पण केले जाते. तसेच सायंकाळी अनेक लोक आपल्या घरात विविध ठिकाणी व प्रामुख्याने 'ठाकूरघोर'मध्ये (देवघरामध्ये) गंगाजल शिंपडतात. यामागचे कारण म्हणजे गंगाजलाच्या पावित्र्यामुळे येणारी रात्र निर्विघ्नपणे व कुटुंबांवर कुठलीही आपत्ती न येता जावो हे आहे. यावरून गंगा व तिच्या जलाबाबत हिंदूंमध्ये किती भक्तीभाव व पावित्र्याची भावना आहे हे जाणवते. बंगालमध्ये भक्तगण अनेकदा मंदिरात जाण्यापूर्वी गंगेत स्नान करतात तसेच देवाच्या मूर्तीला गंगास्नाने अभिषेक करतात.

दहा ते बारा वर्षांच्या बंगाली मुली गंगेच्या गाळयुक्त चिकण मातीपासून शिवलिंग बनवितात व वैशाख महिन्यात (एप्रिल - मे) त्याची पूजा करतात व महिन्याच्या अंती गंगेच्या पात्रात ते विसर्जित करतात. अशा प्रकारे शिवलिंगाची पूजा करून ते गंगेमध्ये विसर्जित करण्यामागचे कारण म्हणजे भविष्यात त्यांना चांगला जीवनसाथी (पती) मिळो ही आहे. यामागे शिव व गंगा हे जसे आदर्श जोडपे आहे अगदी तसेच त्यांचे वैवाहिक जीवन व्यतीत होवो अशी देखील भावना दिसून येते. त्याचप्रमाणे त्यांच्या मनातील इच्छा पूर्ण करण्याची शक्ती गंगेच्या पवित्र जलात आहे असा विश्वासदेखील त्यांच्या मनात असल्याचे जाणवते.

बंगालमधील स्त्रिया गंगावतरणाच्या कथेवर आधारित लोकनृत्ये करतात. हे लोकनृत्य प्रामुख्याने लग्न समारंभासमयी केले जाते. एखाद्या घरात मूल जन्माला आल्यावर त्या मुलाच्या जन्मानंतर काही दिवसांनी शेजारचे लोक बाळंत झालेल्या आईस गंगेच्या तीरावर घेऊन जातात व व नदीला नैवेद्य वगैरे दाखवून कुटुंब व मुलांवर कृपादृष्टी करणारी म्हणून बंगालमध्ये प्रसिद्ध असलेल्या शष्टी ह्या देवीच्या मंदिरात पूजा करण्यासाठी जातात. तसेच उपनयन विधीच्यावेळी ज्या व्यक्तीस जान्हवे घालावयाचे आहे त्या व्यक्तीला तीन दिवस घरातच राहावे लागते. ही व्यक्ती संन्याशाप्रमाणे पिवळी वस्त्र धारण करते व तीन दिवस घराच्या बाहेर पडत नाही व या तीन दिवसात फक्त पोळी व गंगा जल एवढेच भोजन घेतात. त्यानंतर शक्य असेल तर गंगा नदीत स्नान वा अभिषेक करून उपनयन समारंभाची सांगता होते. इतर हिंदूंप्रमाणेच बंगालमधील श्रद्धाळू हिंदू शक्यतो गंगा नदीच्या किनाऱ्यावरच मृत्यू यावा असे मानतात. बंगालमध्ये देखील भारताच्या विविध भागातील लोक गंगेत स्नान करण्यासाठी येतात. गंगेत स्नान केल्यावर पापमुक्ती होऊन मनुष्य शुद्ध होतो असा उल्लेख महाभारतात येतो व आजही अनेक हिंदू यात विश्वास ठेवतात. बंगालमध्ये गंगापूजन हा अतिशय महत्त्वाचा सण मानला जातो व दुर्गा पूजेनंतर गंगापूजनालाच बंगालमध्ये सर्वात जास्त धार्मिक महत्त्व दिले जाते. बंगालमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी गंगेच्या तीरावर मेळे भरतात. ह्या मेळ्यांदरम्यान गंगेच्या तीरावर विविध ठिकाणी लोक गंगास्नानासाठी जमा होतात. ह्या मेळ्यांदरम्यान अनेक व्यापारी विविध वस्तू विकतात. भक्तगण गंगास्नानानंतर ह्या विविध वस्तू ज्यात पूजेचे

सामान देखील असते, विकत घेतात. बंगालमधील असे मेळे, पश्चिम दिनाजपूर, गंगासागर इत्यादी ठिकाणी भरतात. ह्या मेळ्यांना संपूर्ण भारतातून भाविक येत असतात. गंगेतीरावरचे हे मेळे प्रामुख्याने 'माघ' (जानेवारी-फेब्रुवारी) महिन्यात भरतात. तसेच चैत्र (मार्च-एप्रिल) महिन्यात काही ठिकाणी भक्तगण गंगातीरी येतात व भक्तीभावाने गंगा नदीची पूजा करतात.

अशाप्रकारे गंगा नदी ही हिंदू धर्मातील अतिशय पवित्र नदी आहे. तिचे फक्त धार्मिक माहात्म्यच नव्हे तर प्राचीन काळापासून ते आजपर्यंत लोकांच्या जीवनातील व त्यांच्या उदरनिर्वाहाच्या दृष्टीने फार महत्त्व आहे. गंगा ही फक्त हिंदूंचीच नव्हे तर सर्व भारतीयांची माता होय. तिच्या जलामुळे व गाळामुळे आज उत्तर भारतातील बराचसा प्रदेश सुपीक झाला आहे. तेथे मोठ्या प्रमाणात शेती केली जाते व मोठ्या प्रमाणात पीके घेतली जातात. त्यामुळेच आपला भारत अन्नधान्यांच्या बाबतीत स्वयंभू होण्यास मदत झाली आहे. त्यामुळे गंगानदीचे आपणा सर्व भारतीयांवर मोठे उपकार आहेत हे आपण विसरता कामा नये. आज गंगा नदीला भेडसावणारी सर्वात मोठी समस्या म्हणजे प्रदूषणाची समस्या होय. याचा उल्लेख आपण अगोदर केलेलाच आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने आपल्याला गंगानदीची उपासना करावयाची असल्यास गंगाजलाचे होणारे प्रदूषण रोखण्यास मदत केली पाहिजे.

गंगेचे प्रदूषण रोखणे ही फक्त सरकारचीच जबाबदारी आहे असे न मानता ती प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे असे म्हटले पाहिजे. भारतवर्षात गंगेप्रमाणेच इतर अनेक नद्या वाहतात व त्या नद्या त्या त्या क्षेत्रातील लोकांच्या 'जीवन' वाहिन्या आहेत. ह्या नद्यांचे देखील संवर्धन होणे आवश्यक आहे. अन्यथा ह्या नद्या लूप्त पावण्यास वेळ लागणार नाही. निसर्गाने आपल्या भारतावर नद्यांच्या बाबतीत फार मोठे उपकार केले आहेत व आपणास सढळ हस्ते अनेक नद्यांचे दान केले आहे असे म्हणावे लागेल. त्यामुळे आपण भारतीय आपल्या नद्यांची पूजा करतो हे स्तुत्य आहेच मात्र ह्या नद्यांचे प्रदूषणापासून रक्षण करणे ही देखील आपली मोठी नैतिक जबाबदारी आहे.

उत्तराखंडच्या उच्च न्यायालयाने मागच्याच महिन्यात सर्व भारतीयांच्या व प्रामुख्याने हिंदूंच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा ठरणारा निर्णय दिला आहे. हा निर्णय म्हणजे माननीय उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयाद्वारे हिंदूंच्या मनात ज्यांच्या विषयी अतोनात भक्तीभाव आहे अशा गंगा व यमुना ह्या दोन नद्यांना 'लिगल पर्सन' चा कायदेशीर व्यक्तीमत्वाचा (Legal Person) दर्जा दिला आहे. ह्या निर्णयाचा आशय असा आहे की, भारतातील हिंदूंना ह्या दोन नद्यांविषयी अतोनात 'आस्था' असून ह्या नद्यांचे हिंदूंच्या भौतिक व आध्यात्मिक अस्तित्वात मोठे स्थान आहे व ह्या नद्या अनेक भारतीयांचे जीवनमान, नैसर्गिक साधनसंपत्ती वा संसाधने, आरोग्य व भल्यासाठी कळत नकळत कारणीभूत आहेत व त्यामुळे त्या महत्त्वाच्या ठरतात. ह्या निर्णयामुळे आपणास मुलभूत हक्क, जीवनाचा हक्क इत्यादी जे कायदेशीर हक्क आहेत ते ह्या नद्यांना देखील प्राप्त झाले आहेत व ह्या नद्यांच्या हक्कांना वा अधिकारांना कुणाहीकडून धक्का पोहचत असेल तर त्यांच्यावतीने इतरलोक त्यांच्या ह्या हक्कांसाठी वा हक्कांच्या रक्षणासाठी कोर्टात/न्यायालयात जाऊ शकतात व दाद मागू शकतात. एवढेच नव्हे तर घटनेच्या ३२ नुसार सर्वोच्च न्यायालयास २२६ कलमाप्रमाणे भारतातील उच्च न्यायालयांना एखाद्याचे मुलभूत हक्क पायदळी तुडविले जात असतील तर अशावेळी न्यायालयांना स्वतःहून (Suo-Moto) ह्याबाबतीत लक्ष घालून वा हस्तक्षेप करून ज्या व्यक्तीच्या मुलभूत हक्कांवर गदा आणली जात आहे त्या व्यक्तीच्या हक्कांचे रक्षण करण्याचा अधिकार घटनेने दिला आहे. आता गंगा व यमुना नद्यांच्या बाबतीत

कुठलीही विपरीत घटना घडत असेल (उदाहरणार्थ प्रदूषण इत्यादी) तर कोणतीही व्यक्ती त्यांच्यावतीने ह्या नद्यांच्या कायदेशीर हक्कांविषयी न्यायालयात दाद मागू शकते किंवा भारतातील सर्वोच्च न्यायालय व कोणतेही उच्च न्यायालय अशी बाब लक्षात आल्यावर संबंधितांना जाब विचारून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करू शकते. अर्थात, यापूर्वीसुद्धा जनहित याचिकेच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना गंगा व इतर नद्यांचे रक्षण करण्याचा अधिकार होताच; मात्र कोर्टाने ह्या नद्यांना 'लिगल पर्सन'चा दर्जा दिल्यामुळे ह्या नद्यांचे रक्षण करण्याचा कायदेशीर आवाका निश्चितच वाढलेला आहे. त्यामुळे माननीय उत्तराखंड उच्च न्यायालयाचा हा निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे. ह्या निर्णयाच्या अनुषंगाने उत्तर-मध्य मुंबई ह्या लोकसभा मतदार संघातून निवडून आलेल्या भारतीय जनता पक्षाच्या खासदार श्रीमती पूनम महाजन यांनी दिनांक ३ एप्रिल २०१७ च्या 'द इंडियन एक्सप्रेस' ह्या वृत्तपत्रात अतिशय सुरेख लेख लिहिला आहे. वाचकांनी तो जरूर वाचावा. सध्याचे राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार व स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी गंगा नदीसह सर्व नद्यांचे संवर्धन व रक्षण व्हावे अशा मताचे आहेत. त्यामुळेच नरेंद्र मोदींनी केंद्रीय जलसंपदा व गंगा नदी संबंधीच्या विशेष मंत्रालयाची स्थापना केली आहे व उमा भारती ह्या त्या मंत्रालयाच्या मंत्री आहेत. तसेच केंद्र सरकारने गंगेचे संवर्धन करण्यासाठी व प्रदूषण रोखण्यासाठी 'क्लिन गंगा फंडाची' योजना आखली आहे. ह्या फंडामध्ये विविध कंपन्या व व्यावसायिक त्यांची सामाजिक बांधिलकी म्हणून योगदान देऊ शकतात. सध्या ह्या फंडात सुमारे रु.१३७/-(रुपये एकशे सदतीस कोटी) कोटी एवढी रक्कम जमा असल्याचे प्रसार माध्यमांचे म्हणणे आहे. माननीय उत्तराखंड उच्च न्यायालयाचा निर्णय व नरेंद्र मोदींची तळमळ व दूरदृष्टी ह्यामुळे गंगा नदीचे रक्षण होण्यास मदत होणारच आहे पण आपणसुद्धा भारताचे जबाबदार नागरिक म्हणून यात आपला खारीचा वाटा उचलणे आवश्यक आहे.

अभ्यासकांच्या मते 'गंगोत्री' येथील बर्फात दिवसेंदिवस घट होत चालली आहे ही धोक्याची बाब आहे. त्यामुळे आपल्या मनात जिच्याविषयी निस्सीम श्रद्धा आहे अशा गंगामातेचे रक्षण करण्याची आपण सर्वांनी शपथ घेतली पाहिजे. गंगा नदीएवढे लोकांच्या जीवनाशी एकरूप होणारी जगाच्या पाठीवर दुसरी नदी नसावी. याबाबतीत फक्त इजिप्तची नाईल ही नदी गंगेशी थोडीफार स्पर्धा करू शकेल असे मत ऑस्ट्रेलियाचे प्रसिद्ध इतिहासकार व आशियाई संस्कृतींचे अभ्यासक ए. एल्. बाशम यांनी मांडले आहे. ए. एल्. बाशम लिखित इंग्रजीतील 'द वंडर दॅट वॉज इंडिया' हे अप्रतिम पुस्तक वाचकांनी जरूर वाचावे. प्राचीन भारताविषयीची माहितीरूप मेजवानी देणारे हे अत्यंत सुंदर पुस्तक आहे. असो, पुन्हा एकदा आपण सर्वांनी गंगेसह भारतातील सर्व नद्यांचे संवर्धन करण्याची शपथ घेऊ या व एकमुखाने म्हणू या गंगा माता की जय!

संदर्भ :

द गॅंजेज् इन मिथ अँड हिस्ट्री : स्टीव्हन जी. डेरियन

इंडिया अ सेक्रेड जॉग्रफी : डायना एल्. येक

बनारस : सिटी ऑफ लाईट : डायना एल्. येक

ॲन अँथॉलॉजी ऑफ रायटिंग्ज् ऑन द गंगा : संपादकः अस्सा डोरोन, रिचर्ड बार्झ, बारबरा नेल्सन

गंगा : ज्युलियन क्रॅंडॉल हॉलीक

– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

●●●

ओळख वनस्पतींची
दीपमाळा

'ओळख वनस्पतींची' या लेखमालेतील सतरावा भाग. 'दीपमाळा' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे – संपादक

मित्रांनो, फुले म्हटली की ती विविध बागेतील, उद्यानातील किंवा घरासमोरील कुंड्यांमधील, झाडांना आलेली फुलेच प्रथम आपल्या नजरेसमोर येतात. लोकवस्तीपासून दूर, रानावनात व शेतात, पडीक जमिनीवरील झाडांना येणारी फुले काहीशी दुर्लक्षितच राहतात. एरवी कचरा किंवा तण म्हणून पडीक जागेत वाढणाऱ्या काटेरी झुडपांकडे आपण ढुंकूनही बघत नाही. उलट कधी ही पिडा इथून जाईल अशी आपली भावना असते. मात्र या पडीक जागेवरील तणांमध्ये जेव्हा विविध फुलांचे ताटवे फुललेले दिसतात तेव्हा मात्र आपण त्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही. आपल्या मोहक रंगाने, मधूर गंधाने व नेत्रसुखद रचनेमुळे ती फुले येणाऱ्या-जाणाऱ्याचे लक्ष वेधून घेतात. कीटक किंवा पक्षी मात्र माणसासारखा भेदाभेद करीत नाहीत. सौंदर्य ते कुठेही असो अगदी ओसाड माळरान असो, शेत असो की पद्धतशीर योजनाबद्ध रीतीने लावलेली उद्याने वा बागा असोत ते तेवढ्याच आपुलकीने त्या फुलांना भेटी देत असतात. अर्थात ती त्यांची व वनस्पतींची दोघांचीही गरज असते. तसेच कोणत्याही ओसाड वा अडचणीच्या ठिकाणी पोहचणे त्यांना सहज शक्य असते. म्हणून अशा दुर्लभ ठिकाणी आपल्याला जाता येत नसले म्हणून काय झाले; आपल्या आजूबाजूला, आडवळणाला असलेल्या काही पडीक जागेवर नुसता एक डोळस कटाक्ष टाका. सौंदर्याने ओतप्रोत भरलेला खजिना आपल्या हाती लागेल. अशाच पडीक जागेवर आपणास भेटेल एक अनोखं झुडूप. ज्याच्या उंच काठीसारख्या खोडावर एकमेकांपासून काही विशिष्ट अंतरावर वसलेल्या गोलाकार ब्रॅकेटसारख्या दिसणाऱ्या पुष्पगुच्छाचं. कारण हिरव्या काटेरी कोंदणात बसलेली अनेक फुले या ब्रॅकेटमध्ये असतात. त्यांना बघून हमखास आठवण होते ती जुन्या मंदिरांच्या प्रांगणात असलेल्या दगडी दीपमाळांची अन् म्हणूनच या फुलांचे नाव 'दीपमाला' असे पडले असावे.

साधारण २ मीटर उंचीपर्यंत वाढणारे हे झाड भारतात बऱ्याच भागात आढळत असले तरी, दक्षिणेत जास्त प्रमाणात दिसून येते. महाराष्ट्रात सर्वत्र ते दिसते. याची मुद्दाम कुणी लागवड मात्र करीत नाही. शेताच्या बांधावर पडीक जमिनीवर रस्त्याच्या कडेला ते आपोआप उगवते. जेमतेम ८ ते ९ महिने एवढेच आयुष्य असणारे हे झाड जेव्हा फुलांनी बहरते तेंव्हा पूर्ण वर्षभराची कसर भरून काढते. येता-जाता त्याकडे वळून पाहिल्याशिवाय आपण पुढे जाऊच शकत नाही. चौकोनी व मजबूत खोडावर साधारण ३० सें.मी. नंतर १० ते १५ सें.मी. अंतरावर एकासमोर एक

येणारी हृदयाकृती दंतूर पाने त्यांच्या थोडे वर ब्रॅकेट सारख्या दिसणाऱ्या हिरव्या गोलातील काटेरी कळ्यांची रांग. याच काटेरी कळ्यांमधून बाहेर पडणारी लाल केशरी रंगाची नळीसारखी दिसणारी फुले. या केसाळ नळीवजा फुलांचा आकार सिंहाच्या कानासारखा दिसत असल्याने याला इंग्रजीत Lion's ear असेही म्हणतात. इंग्रजीत प्रचलित नाव आहे Klip dagga. अन् शास्त्रीय नाव आहे Leonotis Nepetifolia (LEONOTIS NEPETIFOLIA). काही भागात यांना Lion's tail flowers असेही नाव आहे.

गर्द हिरव्या काटेरी कोंदणात फुलणारी ही फुले मधूरसाने युक्त असल्याने यावर शिंजीर पक्षी तसेच फुलपाखरे व मधमाशांचा कायम वावर असतो. या झाडाला क्वचितच फांद्या फुटतात. पण जवळ जवळ असणारे हे दीपस्तंभ वाऱ्याबरोबर डोलतांना पाहातांना आपले भान हरवते. हिरव्या अन् लाल केशरी रंगाची ही मोहक रंगसंगती केवळ निसर्गच करू जाणे. यात काही जाती गर्द लाल रंगाच्या तर काही शेंदरी अशा. दीपमाळे सारखीच रचना असणारे अन् लांबून पाहिल्यास दीपमाळच वाटणारे अजून एक झाड आहे ते गोजिव्हाचे. पण त्यांच्या फुलांचा रंग, फुलांची रचना व पानांचा आकार पूर्णता वेगळा आहे. त्याबाबत पुढे केव्हातरी सांगता येईल.

दीपमाळेच्या पानांचा तसेच बीयांचा विविध औषधोपचारामध्ये उपयोग होतो. पानाचा उपयोग मानसिक आजारात करतात. यामध्ये वेदनाशामक तसेच मधुमेहावर नियंत्रण ठेवणारे घटक आहेत. आफ्रिकेतही ही वनस्पती मोठ्या प्रमाणात आढळून येते. तेथे याचा वापर ताप, खोकला, मलेरिया तसेच गर्भाशयाचे आजार यावर होतो. यामध्ये Flavonoids, Alkaloids, Phenols आणि Tannin हे प्रचूर मात्रेत आढळते. आपल्याकडे औषधासाठी म्हणून लागवड करण्याची पद्धत अजूनही नाही. निसर्गात सहज उपलब्ध होणाऱ्या वनस्पती गोळा करून त्या व्यापाऱ्यामार्फत औषध कंपन्यांना विकल्या जातात. वनस्पतींची शेती हा एक चांगला पर्याय ठरू शकतो. दीपमालेसारखी वनस्पती तर कमी खर्चात अधिक उत्पन्न देणारी आहे. तूर्त आपण त्याच्या सौंदर्याचा आस्वाद घेऊ या.

– प्रकाश दुधाळकर
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
चाफेकर बंधू मार्ग,
मुलुंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२

●●●

(पृष्ठ क्र.७ वरून.. **विकासवेध–७: पीतक्रांती**)

२. अन्न व सार्वजनिक वितरण खात्याचे अधिकृत संकेतस्थळ http://dfpd.nic.in/oil-division.htm

३. खाद्य तेल–बियांचा पुरवठा आणि मागणी ह्यांबाबतचे भारतातील चित्र: धोरण नियोजनावर होणारे संभाव्य परिणाम, गिरीशकुमार झा व इतर, कृषी–अर्थशास्त्र विभाग, भारतीय कृषीसंशोधन संस्था, नवी दिल्ली, व्हिनस प्रिंटर्स अँड पब्लिशर्स, २०१२, पृष्ठे–११३.

– नरेंद्र गोळे
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

मरावे परि दृष्टीदान करूनी नेत्ररूपी उरावे

नेत्रदानाचे महत्त्व विशद करणारा लेख - संपादक

जगातील सौंदर्याचा आस्वाद घेणे व दैनंदिन जीवन सुरळीतपणे जगणे आपल्याला केवळ डोळ्यांमध्ये दृष्टी असल्यामुळे शक्य होते.पण काही कारणांमुळे जर डोळ्यांच्या संरचनेतील एका अथवा अधिक भागात दोष निर्माण झाला तर मात्र त्या व्यक्तीची दृष्टी जाऊन त्यास अंधत्व येऊ शकते.सर्व प्रकारच्या अंधत्वावर मात करणे शक्य नसते.मात्र ज्यांचे पारपटल (cornea) निकामी झाले असेल पण इतर डोळा चांगल्या स्थितीत असेल तर निरोगी पारपटल बसवून दृष्टी परत मिळविता येऊ शकते.

नेत्रदान म्हणजे काय? नेत्रदान कशासाठी?

पारपटल (cornea) हे डोळ्यांच्या समोरील भागात असलेले काचेप्रमाणे पारदर्शक पटल आहे, जे डोळ्यांच्या संरचनेतील इतर भागांना दृष्टी प्राप्त करण्यास सहाय्यभूत ठरते. जर हे पारपटल एखादा रोग, जखम, जंतुसंसर्ग किंवा कुपोषणामुळे धुरकट झाले असेल तर दृष्टी कमी होते अथवा अंधत्व येते. अशाप्रकारे अंधत्व आलेल्या डोळ्यांमध्ये जर निरोगी पारपटल बसविले गेले तर दृष्टी पुन्हा प्राप्त होऊ शकते.पण मानवी पारपटल हे कृत्रिमरित्या बनविता येत नाही.त्यामुळे निरोगी मानवी पारपटल हवे असल्यास ते केवळ नेत्रदात्याच्या मृत्यूनंतरच वापरता येते. म्हणून मरणोत्तर नेत्रदानाचे महत्त्व आहे. नेत्रदान केल्यावर जरी पूर्ण डोळे काढून नेत असले तरी दृष्टीदानाकरिता फक्त पारपटलाचाच वापर केला जातो. उरलेल्या डोळ्याचा उपयोग डोळयांचे विविध विकार व शस्त्रक्रियेतील संशोधनाकरिता करतात. एका नेत्रदानामुळे व्याधिग्रस्त पारपटलाने अंधत्व आलेल्या दोन व्यक्तिंना दृष्टी प्राप्त होऊ शकते.

नेत्रपेढी म्हणजे काय? नेत्रपेढीचे कार्य

नेत्रपेढी ही एक समाज उपयोगी संस्था असते, ज्यात नेत्रतज्ज्ञ व इतर उपयुक्त तंत्रज्ञ कायम उपलब्ध असतात.ही संस्था पारपटलामुळे अंधत्व आलेल्या व्यक्तिंची यादी बनविते, नेत्रदात्याचे डोळे काढून आणून, ते योग्यप्रकारे तपासून जतन करून ठेवते व प्रतिक्षा यादीप्रमाणे गरजूंना देते. नेत्रपेढ्या ''मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम''च्या अंतर्गत येतात.दान केलेले नेत्र हे विकत घेतले अथवा विकले जाऊ शकत नाहीत. कारण तसे करणे हा कायद्याने गुन्हा आहे.

नेत्रदान कोण करू शकते? नेत्रदान केव्हा व कसे करावे?

- नेत्रदानाचा संकल्प आपण आपल्या हयातीत करू शकतो. मात्र प्रत्यक्ष नेत्रदान हे मृत्यूनंतरच करता येते.
- नेत्रदानासाठी नेत्रपेढीमध्ये जाऊन संकल्पपत्र जरूर भरावे.त्यातुन आपली इच्छा लेखी स्वरूपात व्यक्त होऊन ती साक्षीदार म्हणून सही करणाऱ्या जवळच्या नातलगांना, वारसांना माहीत होते.
- संकल्पपत्र नेत्रपेढीत जमा केल्यावर नेत्रपेढीकडून आपल्यास 'डोनर कार्ड' मिळते. आपण नेत्रदान केले असल्याचे दर्शविणारे हे कार्ड कायम आपल्यासोबत बाळगावे.
- कोणतेही वय, लिंग, धर्म व रक्तगट असलेली व्यक्ती नेत्रदान करू शकते.
- मोतीबिंदू असणे किंवा चष्मा वापरणे या बाबी नेत्रदानाच्या आड येत नाहीत.
- मधुमेह, उच्च रक्तदाब यासारख्या अनुवंशिक व्याधी असलेल्या व्यक्तीसुद्धा नेत्रदान करू शकतात.

सुखी आणि आनंदी रहायचं असेल तर समाजात राहण्याचा प्रयत्न करा. एकटे रहाल तर दुखः पदरी पडेल.

- ज्या अंध व्यक्तींचे पारपटल चांगले आहे, परंतु इतर काही दोषांमुळे अंधत्व आलेले आहे अशा अंधांचेही मरणोत्तर नेत्रदान होऊ शकते.
- अपघातात मृत झालेल्या व्यक्तीचे पारपटल चांगल्या स्थितीत असल्यास स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांच्या परवानगीने नेत्रदान होऊ शकते.
- मृत व्यक्तीने जरी आपल्या हयातीत नेत्रदानाचा संकल्प केलेला नसेल तरीसुद्धा कुटुंबीयांच्या इच्छेने नेत्रदान करणे शक्य होऊ शकते.
- व्यक्ती मृत झाल्यावर त्याचे डोळे त्याच्या घरी अथवा हॉस्पिटलमध्ये देखील काढले जाऊ शकतात.

नेत्रदानाकरिता अपात्रतेचे निकष

मृत व्यक्तीस एड्स, रेबीज, कावीळ, कॅन्सर, सिफीलीस, धनुर्वात, संसर्गजन्य रोग, विषाणूंपासुन होणारे रोग तसेच नेत्रपटलाचे (retina) रोग असल्यास अशा व्यक्तींचे नेत्रदान होऊ शकत नाही.

मृत व्यक्तीच्या नातलगाने अमलात आणावयाच्या महत्त्वपूर्ण सूचना

- मृत्यूनंतर लवकरात लवकर ४ ते ६ तासांपर्यंत नेत्रदान होणे आवश्यक असते. त्यामुळे नेत्रदात्याच्या मृत्यूनंतर नेत्रपेढीला लगेचच नेत्रदानाविषयी कळविणे महत्त्वाचे आहे.
- मृत व्यक्तीने ज्या नेत्रपेढीचे संकल्पपत्र भरले आहे त्याच नेत्रपेढीला कळविणे आवश्यक नाही. त्या ठिकाणच्या जवळच्या नेत्रपेढीला कळविणे वेळेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

नेत्रपेढीला कळवितानाच कृपया खालील बाबी पार पाडाव्यात

- डॉक्टरांकडून मृत्यूच्या कारणासहित मृत्यू प्रमाणपत्र त्वरित मिळवावे. शक्यतो त्यांनाच १० सी. सी. रक्ताचा नमुना घेऊन ठेवण्यास सांगावे.
- मृत व्यक्तीचे डोळे व्यवस्थित बंद करून पापण्यांवर ओल्या कापसाच्या/ कापडाच्या घड्या ठेवाव्यात.
- डोळ्यांवर ठेवलेल्या ओल्या घड्या सुकू नयेत म्हणून मृत व्यक्तीला ज्या खोलीमध्ये ठेवले असेल तेथील पंखा व वातानुकूलित यंत्र बंद करावे.जवळ प्रखर दिवे नसावेत.
- डोक्याखाली उशी ठेवून डोक्याचा भाग उंच करावा.

थोडक्यात पण महत्त्वाचे

- डोळे काढण्याची प्रक्रिया केवळ १५ ते २० मिनिटांमध्ये पूर्ण होते आणि त्यासाठी जंतुविरहीत खोलीची आवश्यकता नसते.
- डोळे काढल्यावर कृत्रिम डोळे किंवा कापसाचे बोळे ठेवून पापण्या व्यवस्थितपणे बंद केल्या जातात त्यामुळे मृत व्यक्तीचा चेहरा विद्रूप दिसत नाही.
- डोळे काढल्यानंतर योग्य ग्रहणकर्ता मिळेपर्यंत डोळे विशिष्ट प्रकारच्या द्रवात जतन केले जातात. परंतु सर्व सामान्यतः त्यांचा वापर ४८ तासांमध्येच केला जातो.

ठाण्यातील काही नेत्रपेढ्यांचे संपर्क:

विश्वनाथ नेत्रपेढी-०२२ २५४१८५४५/
९८३३७१८५५५

सहीयारा नेत्रपेढी-०२२ २५३४१९१९/
९३२०६११९१९

मरणोत्तर नेत्रदान करा, अंधांच्या जीवनात रंग भरा.

– सौ. स्मिता अमोल लिमये
मो. ९९८७००४०५८

●●●

लहानपणी जेव्हा बुद्धिला फाटे फुटलेले नसतात, तेव्हा मन ईश्वराकडे सहज लागते. मोठेपणी बुद्धिला फाटे फुटल्यावर ते ईश्वराकडे लागता लागत नाही. – रामकृष्ण परमहंस

सुभाषित

जीवनाचं क्षणभंगुरत्व सांगत या जगण्यावर शतदा प्रेम करायला शिकवणारं भर्तृहरीचं हृद्‌गत. – संपादक

यावत् स्वस्थमिदं कलेवरगृहं यावच्च दूरे जरा
यावच्चेन्द्रियशक्तिरप्रतिहता यावत् क्षयो नायुषः।
आत्मश्रेयसि तावदेव विदुषा कार्यः प्रयत्नो महान्
प्रोद्दीप्ते भवनेच कूपखननं प्रत्युद्यमः कीदृशः।।

(वैराग्यशतक श्लो.७५)

या सुभाषितात भर्तृहरी म्हणतो की, 'जोपर्यंत हे शरीर स्वस्थ व निरोगी आहे, जोपर्यंत म्हातारपण दूर आहे. जोपर्यंत सर्व इंद्रियांमध्ये शक्ती आहे, जोपर्यंत आयुष्याचा क्षय होत नाही तोपर्यंतच माणसाने स्वतःच्या कल्याणासाठी झटावं. आपल्या जीवनाचे 'श्रेयस' समजून घेऊन त्यासाठी महान प्रयत्न करावे. कारण घराला आग लागल्यावर विहीर खोदण्याचा उपक्रम करणे म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे.'

मराठीमध्ये रूढ झालेली 'आग लागल्यावर विहीर खोदणे' ही म्हण भर्तृहरीच्या वरील श्लोकावरूनच रूढ झाली असं म्हणायला वाव आहे. उपरोक्त श्लोक वैराग्यशतकातील असून व्यक्तीला सावधान करण्यासाठी कवीने हा प्रयास केला आहे. जगातील सर्व धर्म, संप्रदाय व तत्त्वज्ञ कवींनी जीवनाचं क्षणभंगूरत्व वर्णिलं आहे. माणसानी जोपर्यंत डोळे आहेत तोपर्यंत जगातील सुंदर गोष्टी पाहून घ्याव्या, जोपर्यंत वाणी (जीभ) काम करते तोपर्यंत सुभाषितं, अर्थात चांगलं बोलून घ्यावं ज्ञानेश्वर माउली म्हणतात–

''दृष्टी जव जव आहे। तव तव पाहे तेतुले पाहे।।
मूकत्वा आधी वाचा वाहे। सुभाषित''

हात म्हातारपणी खुळे होतील म्हणून आताच दानधर्म करून घ्यावा. वृद्धापकाळी स्मरणशक्ती कमी होईल म्हणून आताच पाठांतर व अभ्यास करून घ्यावा. आदि शंकराचार्यांनी आपल्या 'चर्पटपंजरी स्तोत्रात' एका वृद्धाला उपदेश केला आहे की, म्हातारपणी व्याकरण सूत्रे पाठ करत बसण्यापेक्षा गोविंदाचं भजन कर.

'भज गोविंदं भज गोविंदं गोविंदं भज मूढमते
प्राप्ते सान्निहिते मरणे नहि नहि रक्षति डुकृञ् करणे।।

आत्मश्रेयसाचा विचार प्रत्येक व्यक्तीने करावा हा विचार उपनिषदकाळापासून भारतीय परंपरेत पाहावयास मिळतो. कठोपनिषदातील नचिकेता व यमाचा संवाद 'श्रेयस' व 'प्रेयस' या दोन गोष्टींभोवती फिरत राहतो. 'कोण काळ येईल कसा। नाही देहाचा भरवसा।' असा संतविचार आहे. स्मृतीग्रंथांनी तर सांगीतलंय की, माणसानी जणू आपण अमर आहोत असं समजून विद्या व पैसे मिळवले पाहिजेत व जणू काही मृत्यूने आपल्या केसांना धरलं आहे असं समजून (अर्थात कधीही मृत्यू येईल असं समजून) धर्माचं, कर्तव्याचं आचरण केलं पाहिजे.

संत तुकाराम म्हणतात :

'क्षणोक्षणी हाचि करावा विचार। तरावया पार भवसिंधु।
नाशिवंत देह जाणार सकळ। आयुष्य खाते काळ सावधान।
संतसमागमी धरावी आवडी। करावी तातडी परमार्थाची।

प्रत्येक व्यक्तीने क्षणोक्षणी हा विचार करावा कि हा देह क्षणभंगुर आहे. संतांच्या संगतीत काळक्रमण करावा व स्वतःचं कल्याण करून घ्यावं. परमार्थाची तातडी करावी असं तुकोबा म्हणतात.

महाभारतात एक कथा येते. पांडवांचा वनवास चालु होता. एका निर्जन अरण्यात पांडव विश्रांतीसाठी थांबतात. सर्वांना तहान लागते. पाण्याच्या शोधात एकेक

पांडव निघतो व यक्षाने भारलेल्या एका तळ्याजवळ जातो. यक्षाची एक अट असते. त्याने विचारलेल्या प्रश्नाचं जो योग्य उत्तर देईल त्यालाच पाणी मिळणार. 'यक्षप्रश्न' हे प्रकरण महाभारतात प्रसिद्ध आहे. यक्ष एक प्रश्न विचारतो, 'किं अश्चर्यम्?' अर्थात 'जगातील सर्वात मोठं आश्चर्य कोणतं?' यावर युधिष्ठिर उत्तरतो –

अहन्यहनि भूतानि गच्छन्ति यममंदिरं।
शेषाः जीवितुमिच्छन्ति किमश्चर्यं ततः परम्।।

अर्थात प्रत्येक दिवशी या जगात कित्येक माणसे मरतात. उरलेले थोडावेळ दुःखी होतात पण परत सगळं विसरुन जगायला लागतात. यासारखं मोठं आश्चर्य कोणतं?

भर्तृहरी हा उच्च दर्जाचा कवी आहे. मृत्यू समोर आल्यावर त्याच्यासमोर कोणाचंच चालत नाही व म्हणून आग लागल्यावर विहीर खोदण्यापेक्षा विद्वान माणसाने आधीपासूनच आत्मउन्नतीसाठी जागृत झालं पाहिजे असा संदेश तो देतो. इंग्रजी साहित्यातील Andrew Marvell हा कवी आपल्या 'To His Coy Mistress' या कवितेत हाच आशय व्यक्त करतो.

"But at my back I always hear
Time's Winged Chariot hurrying near."

अर्थात माझ्या कानांना एक अनाहत ध्वनी नेहमी ऐकू येतो व तो ध्वनी काळपुरुषाचा आहे. मार्व्हेलनी एक विलक्षण सुंदर शब्द वापरला आहे व तो म्हणजे 'Times's Winged Chariot'. अर्थात काळाचा एक रथ आहे व त्या रथाला पंख आहेत. उडणारा रथ आहे हा. काळाला या एवढं सुंदर रुपक ते काय असू शकतं.

जॉन मिल्टन या जगप्रसिद्ध इंग्रजी कवीने आपल्या २३ व्या वाढदिवशी एक अप्रतिम सुनीत लिहिलं. 'काळानी माझ्या या सुंदर आयुष्यातील २३ वर्षे कधी चोरले हे मला कळलं नाही', असं मिल्टन म्हणतो.

"How Soon Hath Time, the subtle thief of youth,
Stol'n on his wing my three and twentieth year!
My hasting days fly on with full career"

या सर्वच क्रांतीदर्शी कवींचा व सुभाषितकारांचा हा सल्ला सध्याच्या धकाधकीच्या जीवनात अत्यंत उपयुक्त आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या जंजाळात माहितीचा विस्फोट होत असताना 'ज्ञान', 'आत्मोन्नती' 'श्रेयस्' आदी शब्दांचा सुद्धा आपला अभ्यास असावा व व्यक्तीने जागरूक होऊन कालक्रमण करावं असाच भर्तृहरीला सल्ला द्यायचा आहे.

– प्रा. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी : ९४२२४९५०९४
Email :dharmadhikari.prashant@gmail.com

●●●

(पृष्ठ क्र.४ वरून...**सिंगापूर येथील भारतीय राष्ट्रीय सेनेचे स्मारक**)

आधीचा इतिहास तर लिहिलेला आहेच; त्याचबरोबर सिंगापूरमध्ये कोणकोणत्या ठिकाणी युद्ध झाले याचा नकाशा देखील दिलेला आहे. भारतीय राष्ट्रीय सेनेचे स्मारक पाहून झाल्यावर आम्ही परत आपल्या निवासस्थानाकडे जायला निघालो. जवळच सिटी मॉल हे भूयारी रेल्वेचे स्थानक असल्याचे आमच्या लक्षात आले. तिकडे जात असताना आमचे लक्ष एका मोठ्या स्मारकाने वेधून घेतले. पहिल्या महायुद्धात कामी आलेल्या सिंगापूरमधील सैनिकांसाठी हे स्मारक उभारलेले त्याचे छायाचित्र घेण्याची इच्छा आम्ही आवरु शकलो नाही.

– डॉ. सुधाकर आगरकर आणि डॉ. नितीन जोशी
डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन संस्था,
ठाणे–४००६०१

परिसर वार्ता

- संकलित

सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

एलिमेंटरी व ईंटरमिजिएट चित्रकला श्रेणी परीक्षा २०१६–२०१७ :

एलिमेंटरी श्रेणी परीक्षा १००%	ईंटरमिजिएट श्रेणी परीक्षा १००%
एकूण विद्यार्थी – ५८	एकूण विद्यार्थी–४९
उत्तीर्ण विद्यार्थी – ५८	उत्तीर्ण विद्यार्थी ह्न ४९
'अ' श्रेणी – १०	'अ' श्रेणी – १०
'ब' श्रेणी –२३	'ब' श्रेणी – २५
'क' श्रेणी – २५	'क' श्रेणी – १४

इतिहास प्रज्ञा शोध परीक्षा २०१६ – १७ :

इयत्ता	परीक्षेस बसलेले विद्यार्थी	उत्तीर्ण झालेले विद्यार्थी
५ वी	९	९
६ वी	१३	१२
८ वी	३१	२४
१० वी	५३	५०

सर्वात जास्त गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :

इ.	विद्यार्थ्याचे नाव	गुण	शेरा
५वी	निहारिका मोरे	९०	जिल्हास्तरीय १ला क्रमांक
८वी	अदित्य सामंत	९२	जिल्हास्तरीय १ला क्रमांक

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅथमॅटीक्स आयोजित ज्यूनियर मॅथ्स ऑलिम्पियाड परीक्षा २०१६ – २०१७ :

कु. केतकी धर्माधिकारी हिने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले.

होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०१६–२०१७ चे निकाल :

इ. ६ वी – कु. वरदा धाप्रे – कांस्य पदक

ब्राह्मण सेवा संघ आयोजित मराठी वक्तृत्व स्पर्धेचा निकाल :

गट (इ. ५वी ते ७ वी) कु. श्रेया मोघे – प्रथम क्रमांक

COE (Cyber Olympiad Exam-2nd Level) युनिफाईड कॉन्सिल परीक्षा – निकाल :

विश्वराज बोरकर – विभागीय स्तरावर तिसरा क्रमांक.

रामायण परीक्षा २०१६ – २०१७ :

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी – ३०

उत्तीर्ण झालेले विद्यार्थी – २४

विशेष प्रावीण्य	प्रथम श्रेणी	द्वितीय श्रेणी	तृतीय श्रेणी
४	१५	४	१

विशेष प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांची नावे – विद्यार्थ्याचे नाव व गुण

१) मृण्मयी गांगल ८३/१००

२) यतीश वैद्य ८३/१००

३) अबोली शिंदे ९१/१००–जिल्हा स्तरीय द्वितीय क्रमांक

४) शौनक धामणस्कर ८६/१००

विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

१. डॉ. व्ही. एन. बेडेकर जन्मशताब्दी व्याख्यानमाला

वि.प्र.म.चे माजी अध्यक्ष डॉ. व्ही. एन. बेडेकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त आयोजित केलेला भाग म्हणून विधी महाविद्यालयामध्ये दि. ५ मार्च रोजी डॉ.

रश्मी ओझा, विधी विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. 'लिंग न्याय' आव्हाने आणि प्रस्तावना मार्ग या विषयावर त्यांनी व्याख्यान दिले. तसेच २५ मार्च रोजी ॲड. गोपीचंद खाडे यांनी 'तपास आणि गुन्हेगारी वस्तू चाचण्या न्यायवैधक विज्ञान महत्त्व' या विषयावर व्याख्यान दिले. या दोन्ही व्याख्यानास विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

२. सांस्कृतिक व खेळ महोत्सव साजरा

दि. १८ मार्च ते २१ मार्च दरम्यान महाविद्यालयामध्ये वार्षिक खेळाचे व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी अनेक स्पर्धांमध्ये व सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

३. प्रात्यक्षिक परीक्षा

विधी महाविद्यालयामध्ये दि. १ मार्च व २४ मार्च रोजी प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक विषयाच्या लेखी परीक्षा घेण्यात आल्या. या शिवाय तृतीय वर्षाच्या अभिरूप न्यायालय परीक्षा घेण्यात आल्या. दि. २९ मार्च रोजी परीक्षांचा निकाल जाहीर करण्यात आला.

४. विधानभवन भेट

दि. २३ मार्च रोजी विधी महाविद्यालयाचे ६० विद्यार्थी, प्रा. विनोद वाघ, प्रा. अरुण गायकवाड, प्रा. हेतल मिशेरी यांच्या मार्गदर्शनाखाली विधानभवनास भेट देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी विधानसभा व विधानपरिषदेचे कामकाज बघितले.

५. महाविद्यालयामध्ये BGL व LL.B. या पदव्यांचे वितरण करण्यात आले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या पदव्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांच्या हस्ते स्विकारल्या. यावेळी अनेक प्राध्यापक उपस्थित होते.

६. विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी मार्च महिन्यात खालील स्पर्धेमध्ये भाग घेतला.

अनु क्र.	स्पर्धेचे नाव	आयोजन करणाऱ्या संस्थेचे नाव	तारिख	भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांची नावे
१.	सतवा एम. के. नामब्यार स्मरणार्थ राष्ट्रीय स्तरावरील अभिरूप न्यायालय स्पर्धा	कर्नाटक लॉ सोसायटी राजालखमगौडा विधी महाविद्यालय, बेलगावी	१० ते १२ मार्च,	ऐश्वर्या गोखले ऐश्वर्या चिटणीस २०१७

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनच्या 'उद्योजकता विकास सेल आणि रोटरी क्लब ऑफ ठाणे अपटाऊन' तर्फे Wellness Initiative For Student Empowerment चे आयोजन.

तंत्रनिकेतनच्या उद्योजकता विकास सेल आणि रोटरी क्लब ऑफ ठाणे अपटाऊन तर्फे 'व्यवसाय कौशल्य विकास' कार्यक्रम दि. १६ फेब्रुवारी २०१७ रोजी आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने करण्यात आली. सदर एक दिवशीय प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य दि. कृ. नायक, क्लब अध्यक्ष माधवी खारोटे, युथ डायरेक्टर ललिता आर्गेकर, प्रमुख पाहुणे श्री. एन. कल्याण (व्यवस्थापकीय संचालक आणि संस्थापक ELCA ग्रुप ऑफ लॅबोरॅटरीज्) आणि

उद्योजकता विकास सेल स्टाफ प्रतिनिधी सौ. राधिका कामत इत्यादींच्या उपस्थितीत करण्यात आले.

प्राचार्य दि. कृ. नायक यांनी सर्व वक्ते, प्रशिक्षणार्थींचे स्वागत केले आणि उद्योजकता विकासाचे महत्त्व आणि फायदे सांगितले. प्रमुख वक्ते श्री. एन. कल्याण यांनी गुणात्मक जीवन, मनःस्वास्थ्य, शरीर आणि भावना इत्यादींचा परामर्ष घेतला. जवळ-जवळ १०० प्रतिनिधिंनी सदर कार्यक्रमाला हजेरी लावली.

सदर कार्यक्रमात उपस्थित वक्त्यांनी खालील विषयांवर आपले विचार व्यक्त केले. वक्ते आणि विषय खालीलप्रमाणे

वक्ते	विषय
१) श्री. सॅम परुळेकर (संस्थापक आणि CEO of I-Mind ट्रेनिंग सोल्युशन ॲन्ड कन्स्लटंसी)	Be-Incharge : Mind Management.
२) कु. शिवानी अमृते (आहार तज्ज्ञ)	My complicated vehicle
३) डॉ. मोहन चंदावरकर (स्त्रीरोग तज्ज्ञ)	I-dare Face the Fear.
४) श्री. सुनील गवलानी certified ट्रेनर	Half Glass Full - why be positive
५) श्री. पुषन वैद्य (ज्वेलरी व्यावसायिक)	Addiction - To be Free
६) श्री. सुदर्शन सिंग (डायरेक्टर जॉईन्ट एन मोशन)	Go Fit
७) डॉ. चित्रलेखा मेहता (BAMS)	Being Adult - Hygiene and sex education.

सदरच्या सर्व कार्यक्रमांचं कामकाज युथ डायरेक्टर रिटायर्ड ललिता अग्रेकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी निरोप समारंभ प्रसंगी Wise Champions पारितोषकाचे वितरण करण्यात आले. त्यामध्ये श्री. देशपांडे (SYCO) व शिखा त्रिपाठी (SYIE) या दोघांची अनुक्रमे Mr. Wise आणि Ms. Wise म्हणून निवड करण्यात आली आणि चॅम्पियन्स म्हणून श्री. प्रसाद भोर (SYCO) श्री. बिलाल शेख (SYIS) श्री. सागर देढिया (SYIF) आणि श्री. दबीर मनिष (TYEPS) यांची निवड करण्यात आली.

सदर कार्यक्रम तंत्रनिकेतनमधील A.V. रूम येथे सकाळी ९.०० ते ५.०० दरम्यान पार पडला.

NBA Expert Team तर्फे विद्या प्रसारक मंडळाच्या, तंत्रनिकेतनला भेट

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे या

संस्थेची नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडिटेशन, (NBA) नवी दिल्लीच्या तज्ज्ञांनी दि. २४ मार्च ते २६ मार्च २०१७ दरम्यान पाहणी केली. तंत्रनिकेतनमधील अध्ययन आणि अध्यापन, मुलभूत सोयीसुविधा, ग्रंथालय, प्रयोगशाळा इत्यादीची पाहणी केली. कम्प्युटर इंजिनियरिंग, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम, इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स आणि इन्स्ट्रूमेंटेशन या तंत्रनिकेतनातील पाच अभ्यासक्रमाकरिता NBA च्या तज्ज्ञांनी पाहणी केली. प्रत्येक विभाग प्रमुखांनी आणि त्यांच्या स्टाफनी आपआपल्या विभागाचे कार्य तज्ज्ञांसमोर सादर केले. पालकांशी, विद्यार्थ्यांशी, माजी विद्यार्थ्यांशी आणि व्यवस्थापनाशी तज्ज्ञांनी सुसंवाद साधला व संस्थेच्या कार्याविषयी माहिती जाणून घेतली.

डॉ. जी. पी. प्रभुकुमार हे पॅनलचे प्रमुख होते. शिवाय डॉ. अग्रसेन सुमन, प्रा. एस. ए. खान, प्रा. दीपक रंजन पोतदार, डॉ. प्रेरणा गौर व डॉ. विशाल भटनागर इत्यादी सहतज्ज्ञ म्हणून आले होते.

महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

दिनांक: १ जानेवारी २०१७ ते १५ एप्रिल २०१७

महाविद्यालयास भारत सरकारच्या 'प्रधानमंत्री कौशल्य विकास योजने'चा प्रकल्प मंजूर झाला. या प्रकल्पाचा उद्घाटन समारंभ शनिवार दि. २४ डिसेंबर २०१६ रोजी करण्यात आला. यामध्ये मार्बल ग्रेनाईट आणि स्टोन, इलेक्ट्रॉनिक दुरुस्ती व संगणक समन्वयक यासारख्या विभागांमधील नोंदणीकृत प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. यामध्ये विद्यार्थी पालकांबरोबर इतरही ग्रामस्थ उपस्थित होते. या उपक्रमास मार्गदर्शन करण्यासाठी महाविद्यालयात श्री. मुकुंद शेवडे (In charge,OP Jindal centre for vocational training, JSW Jaigad) हे आले होते. आपल्या व्याख्यानातून त्यांनी औद्योगिक क्षेत्रातील सुरक्षिततेचे महत्त्व, आरोग्याचे महत्त्व, बदलते उद्योगविश्व आणि त्यांचा शैक्षणिक क्षेत्राशी असणारा संबंध या विषयीचे विचार मांडले. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी देखील शैक्षणिक क्षेत्रातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला व विद्यार्थ्यांनी हे गांभीर्याने का घेतले पाहिजे या विषयी चर्चा केली.

दिनांक २८ फेब्रुवारी २०१७ हा 'जागतिक मराठी भाषा दिन' हा कविवर्य कुसुमाग्रज ऊर्फ वि. वा. शिरवाडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाविद्यालयातील नाना फडणवीस सभागृहात उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्रथम वर्ष विभागप्रमुख प्रा. अमित माने यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी दैनंदिन जीवनातील संप्रेषण हे मराठी भाषेतूनच व्हावे असे प्रतिपादन केले. तर ग्रंथपाल संतोष चतुर्भूज यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये मराठी भाषेचा ऐतिहासिक गोषवारा घेतला व ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त पद्मभूषण वि.वा. शिरवाडकर यांचा जीवनवृत्तांत सांगितला.

या कार्यक्रमादरम्यान मराठी भाषेतील नामवंत कवींच्या कविता महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थांनी सादर केल्या. यात संगणक विभागाचे प्रा.नितीश शिंदे यांनी 'स्त्री-भ्रूण हत्या' यावरील कविता सादर केली. प्रथम वर्षाचे प्रा. औदुंबर पाटकर यांची 'गाण्यावरचे बोल गाणे' व इलेक्ट्रिकल विभागाची विद्यार्थिनी कु.ज्योती घोरपडे हिने स्वलिखित 'आठवणी' ही कविता तर ग्रंथालय विभागातील मयुरी देवरुखकर यांनी 'एकटेपणा' ही लघुकथा सादर केली.

महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयातील केंद्रीय ग्रंथालयामार्फत दिनांक १५ फेब्रुवारी २०१७ ते १७ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत तीन दिवसिय

'बिब्लिओमॅट्रिक्स, सायंटोमॅट्रिक्स व वेबोमॅट्रिक्स' या विषयांवरील राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न झाली. ही कार्यशाळा ग्रंथालयाच्या कामकाजाविषयी होती. संशोधन नियतकालिकांमध्ये प्रकाशित होणाऱ्या आशयाचे, संदर्भाचे विविध अंगानी संशोधनपूर्ण अभ्यास करण्याचे बिब्लिओमॅट्रिक्स हे एक शास्त्र आहे. तर विज्ञानाचे विज्ञान म्हणून ओळखले जाणारे सायंटोमॅट्रिक्स हे एक नवीन शास्त्र आहे. विषयाचा विकास कसा झाला व होत आहे, कोणत्या विषयाचा कोणत्या विषयावर प्रभाव किती आहे याचा संशोधनपूर्ण अभ्यास सायंटोमॅट्रिक्स या विषयात केला जातो. संगणकावरील वेबसाईट, ई-दस्तावेज यांचा अभ्यास वेबोमॅट्रिक्स या विषयात केला जातो. हे सर्व विषय शैक्षणिक व संशोधन ग्रंथालयांना आवश्यक आहेत. अशा महत्त्वपूर्ण विषयावर महाराष्ट्रात प्रथमच कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेत महाराष्ट्र, छत्तीसगड, गोवा, म्हैसूर, कर्नाटक, तमिळनाडू या विविध ठिकाणांहून तीस ग्रंथपाल उपस्थित होते. या कार्यशाळेच्या उद्घाटनास कर्नाटक स्टेट वूमन्स विद्यापीठाचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. प्रल्हाद तडसद प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी उद्घाटना प्रसंगी बिब्लिओमॅट्रिक्स या विषयाचे ग्रंथालय व्यवस्थापनातील महत्त्व व या विषयाची व्याप्ती विषद केली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ.विजय बेडेकर होते. त्यांनी पाश्चात्य देशात या विषयाचा विकास किती व्यापक झाला आहे व त्यामुळे होणारे फायदे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल व कार्यशाळा समन्वयक संतोष चतुर्भूज यांनी केले. हा विषय ग्रंथपालांबरोबरच प्राध्यापकांना किती आवश्यक आहे हे त्यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले. तसेच Impact factor, Bibliometric Indicator, h-index, i-index अशा विविध घटकांची माहिती त्यांनी दिली.

या कार्यशाळेत भारतातील नामांकित विद्यापीठातील प्रमुख प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. यामध्ये म्हैसूर विद्यापीठाचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ.एन.एस. हरिनारायणा, कर्नाटक विद्यापीठाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ.गुरुराज हादगली, अन्नामलाई विद्यापीठ तमिळनाडू येथील प्राध्यापक डॉ. एम. सादीक बच्छा, नॉर्थ महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील गणित व सांख्यिकी विभागाचे विभागप्रमुख डॉ.रामकृष्ण शिंदे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्रा. डॉ. मोहन खेरडे अशा अनेक दिग्गज मान्यवरांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

सदर कार्यशाळेतील तीस ग्रंथपालांव्यतिरिक्त महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापकांनी या कार्यशाळेस उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेल्या विषयाचे ज्ञान घेतले. ही कार्यशाळा म्हणजे ज्ञान घेणाऱ्यांसाठी एक अदभूत पर्वणी होती असे मत सहभागी ग्रंथपालांनी मांडले.

या कार्यशाळेतील विषयाचे नावीन्य लक्षात घेता या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी या महाविद्यालयाचे ग्रंथपाल एक वर्षापासून काम करीत होते. त्यामुळेच अतिशय चांगले नियोजन, व्यवस्थापन व समृद्ध आशय या कार्यशाळेत देता आला. ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन व प्रेरणा मिळाली. तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शिल्पा कामत व सर्व विभागांचे विभाग प्रमुख, ग्रंथालय कर्मचारी आणि महाविद्यालयातील इतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाचा प्रथम पदवी प्रदान सोहळा दि.२५ फेब्रुवारी २०१७ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणे येथील शैक्षणिक संकुलातील थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे संपन्न झाला. महाविद्यालयातील मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल,